

# नेवासे ते वडगावपान

# माणूस

२३ मार्च १९६८ : चाळीस पैसे







# अन्न स्वतंत्रता संचलन

## संचलन कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| दि. १५ | मार्च | वेल्होळी |
| दि. १६ | मार्च | वाडीवरे |
| दि. १७ | मार्च | घोटी |
| दि. १८ | मार्च | इगतपुरी |
| दि. १९ | मार्च | कसारा |
| दि. २० | मार्च | खर्डी |
| दि. २१ | मार्च | अटगाव |
| दि. २२ | मार्च | शहापूर |
| दि. २३ | मार्च | वाशीम |
| दि. २४ | मार्च | पडघा |
| दि. २५ | मार्च | भिवंडी |
| दि. २६ | मार्च | कल्याण |
| दि. २७ | मार्च | डोंबिवली |
| दि. २८ | मार्च | ठाणा |
| दि. २९ | मार्च | घाटकोपर |
| दि. ३० | मार्च | शीव |
| दि. ३१ | मार्च | मुंबई |

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : त्रेचाळीसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

---

स. न. मार्च–७

त्यांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी हे शीर्षक वाचले व विचारास चालना मिळाली व माझ्या अनुभवास आलेला प्रसंग आठवला. मी जेव्हा विद्यार्थी परिषदेच्या प्रकल्पान्वये नागालँडला गेलो तेव्हाचा हा प्रसंग. मी ज्या घरात कोहिमाला उतरलो होतो तेथील माझी यजमान श्रीमती मेने हिच्याशी दुष्काळाच्या परिस्थिती-बाबत चर्चा चालली होती आणि आपण दिलेले उदा-हरण पुढे आले. मी त्यावर म्हटले त्या मुलांच्या निष्पाप व सहृदय भावनांचा अनादर करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. पण त्यांना असा उपास करायला सांगणाऱ्या धर्मगुरूंच्या व नेत्यांच्या भावना शुद्ध होत्या का ? ती ख्रिश्चन व परकीयांच्या सद्‌हेतुबद्दल कळवळा बाळग-णारी असल्यामुळे चिडली, व म्हणाली, ह्या निरागस मुलांचे ऋण तुम्ही असे फेडणार आहात काय ?

ऋणातून कोणालाही मुक्त होता येत नाही, म्हणूनच खाऊ पाठविण्याची आपली कल्पना आवडली.

अजित पटवर्धन, पुणे

---

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण,
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९


प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ‘ माणूस ’ साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# प्रतिपच्चंद्ररेखेव

# ६

**ममदापूर ग्रामस्थांच्या समवेत**
**एक यात्रिक**
शेजारी तरुण सरपंच सर्फराज
अब्दुल हाजी पटेल
आणि गावातील एक प्रतिष्ठित नागरिक
गणेश रमाकांत नाईक





**श्रीरामपूरच्या वेशीवर**
**दोन यात्रिक**
आणि स्थानिक कार्यकर्ते
काही जनसंघीय, काही सर्वोदयी


**श्री. सूर्यभान वहाडणे पाटील**
जनसंघाचे पूर्ण वेळ कार्य करणारे
हे जर बरोबर नसते तर काही ठिकाणी
सभाही होऊ शकत नव्हत्या
आणि शेजारी
पद्मश्री विखे पाटील यांचे चिरंजीव
प्रवरानगर साखर कारखान्याचे प्रमुख





**श्री. बाळासाहेब विखे पाटील**


यांची उपस्थिती लाभली म्हणूनच
लोणी गावची सभा यशस्वीरीत्या
पार पडू शकली.




जाळीनिमगावपासून
पुन्हा यात्रा सरसरू लागली
कामानिमित्त पांगलेले सैनिक
पुन्हा एकत्रित आले आणि

**आणि अशी दृश्ये दिसू लागली**

त्र्यंबकजी डेंगळे
यांच्या या लहानशा गावात
अनेक शिक्षणसंस्थांचा व्याप सांभाळणारी



**श्री. भास्कर सावळेराम चोपडे**


यांच्यासारखी एक जागरूक व्यक्ती
सैनिकांच्या व्यवस्थेत कुठलीही उणीव
राहू नये म्हणून जातीने सर्व गोष्टींकडे
लक्ष पुरवीत होती.

**त्रिभुवनैक प्रसिद्ध । अनादी पंचक्रोश क्षेत्र ।**
**जेथ जगाचे जीवनसूत्र । महालया वसे ॥**

असे नेवासे मागे पडले.
एका वेगळयाच मुलखातून चाललो
आहोत असे भासत होते.
सभा होत होत्या, गावे येत-जात होती
माणसे भेटत होती
पण दाद अशी कुठेच मिळत नव्हती.
आलात या, गेलात जा.
असा सगळा कोरडा व्यवहार होता.
वास्तविक भाग सगळा 'ओला'...
पाटाचे पाणी, उसाची शेती
लाखालाखाची गुदामे
घरोघर जिप्स
खांद्याखांद्यांवर ट्रॅन्झिस्टर्स
पण कुठेही, सैनिकांपैकी कुणालाही
संध्याकाळी
'शुभं करोती' म्हणावेसे वाटले नाही.


मागे सहसा असे घडत नसे.
मारुतीच्या देवळात किंवा स्वच्छ
सारवलेल्या शाळेच्या वर्गात
एखादा अभंग, आश्रमातील प्रार्थना
रामरक्षा, पसायदान
कुणीतरी म्हणत असे,
इतर त्याला साथ देत
गावातील मुले-माणसेही येऊन बसत
पण इथून पुढे हे सारे आपोआप बंद पडले

सैनिकांची संख्याही घटली
कधी तीन कधी दोनसुद्धा
संचलनाला जवळजवळ पदयात्रेचे स्वरूप
आले.
सैनिक हा यात्रिक ठरला.




**नवीन कुमक**

कोकणगाव येथे
काही नाटकवेडी, साहित्यप्रेमी,
तरुण मंडळी
संचलनात सामील झाली
अप्पा रघुनाथ पवार
बाळासाहेब जोंधळे
संपत कृष्णाजी घोरपडे
रावसाहेब भीमा वायकर
साहेबराव नामदेव पानसरे...



**पारावरच्या बैठकी**

लहान लहान खेडेगावात ठरलेल्या
सभा होतच असत,
पण
कधी कधी ठरलेल्या सभांव्यतिरिक्त
ऐनवेळच्या पारावरच्या बैठकीही रंगत.
वडगावपान येथे रावसाहेब पटवर्धन
येणार
अशी वार्ता होती
पण





**पद्य गायन**

पण प्रत्यक्षात
संगमनेरचे विद्यार्थी शिबिर
आटोपून
येथे दाखल झाले
तीन सर्वोदयी कार्यकर्ते—
गंगाप्रसाद आग्रवाल
नारायण सांगोलकर
देवराम अंभोरे
आणि यांच्या
पद्यगायनाचा कार्यक्रम
श्रोत्यांना मनापासून
आवडला.

**प्रमुख मंडळी**

गायन कार्यक्रमाला
श्रोत्यांची संख्या खूप होती
सभाही मोठी झाली
माधव किसन माळी
संपतराव काशिनाथराव मोरे
सर्व श्रेय या उभयतांकडे.



**एक सकाळचे दृश्य**

साऱ्या महाराष्ट्रात विड्यांच्या पानांसाठी
व सर्व हिंदुस्थानात सर्कशीच्या खेळांसाठी
प्रसिद्ध असणाऱ्या वडगावपानच्या
एकेकाळच्या या पुढारलेल्या गावाचा
निरोप घेण्यापूर्वी
दूधवाटप केंद्रासमोरील
वरील दृश्य आमच्या
छायाचित्रकाराने टिपले आणि
संचलन निघाले... संगमनेरकडे...

# दिल्ली दरबार

राष्ट्रपती काय किंवा राज्यपाल काय, आपल्या घटनेप्रमाणे हे दोघेही नामधारी सरकारप्रमुख आहेत. तशी गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याशिवाय राष्ट्रपतींना किंवा राज्यपालांना प्रशासनात हस्तक्षेप करता येत नाही. लोकप्रतिनिधींचा विश्वास असणाऱ्या मंत्रिमंडळाने देशाच्या व राज्यांच्या कारभाराची धुरा वाहावी आणि खऱ्याखुऱ्या अर्थाने लोकशाही दृढमूल व्हावी या उद्देशाने या तरतुदी करण्यात आल्या आहेत.

पण गेल्या पाच-सहा महिन्यांतील आपल्या लोकप्रतिनिधींनी काही राज्यांत असे वर्तन केले की त्यामुळे 'वस्स झाला हा लोकशाहीचा खेळखंडोबा! त्यापेक्षा सरळ राष्ट्रपतींची राजवट परवडली,' असे म्हणण्याची लोकांवर पाळी आली. लोकशाहीत लोकहित हा मानदंड असतो याची आमच्या प्रतिनिधींना इतकी विस्मृती झाली की, एखाद्या क्षुद्र अधिकारपदासाठी आपली सदसद्विवेकबुद्धी आणि लोकहित यांवर पाणी सोडण्यास त्यांना विलकुल संकोच वाटला नाही. लोकशाही हा केवळ राज्ययंत्रणेचा सांगाडा नसतो, ती एक मनःप्रवृत्ती आहे आणि ही प्रवृत्ती जोपर्यंत राजकारणात वावरणाऱ्या कार्यकर्त्यांच्या अंगात बाणत नाही तोपर्यंत या असल्या नकली लोकशाहीपेक्षा सरळसरळ राष्ट्रपतींची राजवट बरी असे जर लोक म्हणू लागले तर त्यांना त्याबद्दल कसे दोषी धरता येईल ?

हरियाना, पंजाब, बंगाल, उत्तर प्रदेश आणि बिहार या पाच राज्यांमध्ये संयुक्त विधायक दल या साळसूद नावाखाली एकत्र आलेल्या राजकीय पक्षांनी अनपेक्षितपणे हाती आलेली सत्ता केवळ आपल्या पक्षाच्याच हाती राहावी यासाठी भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब करण्यास किंचितही संकोच बाळगला नाही. हरियानाचे त्या वेळचे मुख्य मंत्री श्री. राव बीरेंद्रसिंग यांनी आपल्या हाती सत्ता राहावी या एकाच ध्यासापायी विधानसभासदस्यांना आश्वासनांची आणि अधिकारपदांची खैरात करण्यास एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रारंभ केला की, सकाळचा काँग्रेससदस्य संध्याकाळी संयुक्त आघाडीत सामील झालेला असायचा तर आदल्या दिवसापर्यंत जनसंघाच्या विरुद्ध मिरविणारा दुसऱ्या दिवशी काँग्रेसच्या कळपात सामील झालेला असावयाचा. आपल्या आठ-दहा महिन्यांच्या कारकीर्दीत बीरेंद्रसिंग यांनी सार्वजनिक जीवनात

# लोकशाहीचा उद्दाम अधिक्षेप

कार्यकर्त्यांने पाळावयाच्या किमान निष्ठेची एवढी विटंबना केली की, त्यापेक्षा राज्यपालांनी आपल्या हाती सारी सत्ता घेऊन आपल्या सल्लागारांकरवी राज्यकारभार केला तर निदान प्रशासनाचे दैनंदिन कार्य तरी सुरळीत राहू शकेल, असे लोक म्हणू लागले.

हरियानाच्या शेजारी असलेल्या पंजाबमध्ये गुरुनामसिंग–मंत्रिमंडळ अधिकारावर होते. या मंत्रिमंडळातल्या लक्ष्मणसिंग गिल यांना केवळ मंत्रिपदावर समाधान वाटत नव्हते. आपल्याला मुख्य मंत्रिपद मिळाले पाहिजे यासाठी त्यांची धडपड चालू होती. संयुक्त आघाडीत राहून आपले उद्दिष्ट पुरे होत नाही असे आढळून आल्यावर लक्ष्मणसिंग गिल यांनी संयुक्त मंत्रिमंडळाविरुद्ध बंडाचा झेंडा उभारून गुरुनामसिंग मंत्रिमंडळाला खाली खेचले आणि काँग्रेसच्या पाठीवर उभे राहून मुख्यमंत्रिपदाची खुर्ची गाठली. यानंतर पंजाबमधील राजकारणाचा एवढा खेळखंडोबा झाला आहे की, सभापतींनी विधानसभेची बैठक दोन महिने स्थगित केली. जी विधानसभा लोकशाहीची रखवालदार मानली जाते ती आपल्याला गैरसोईची ठरताच विधानसभेच्या प्रमुखाने म्हणजे सभापतीने तिला बासनात गुंडाळून ठेवावे यापेक्षा लोकशाहीचा अधिक उर्मट अवमान तो कोणता !

पंजाबचे सभापती श्री. जोगिंदरसिंग मान यांनी हे तंत्र पश्चिम बंगालच्या सभापतींकडून उचलले आहे. पश्चिम बंगालमधील अजय मुखर्जी यांची राजवट डॉ. प्रफुल्लचंद्र घोष संयुक्त आघाडीतून बाहेर पडताच कोसळण्याच्या बेतात आली होती. डॉ. घोष संयुक्त आघाडीतून बाहेर का पडले तसेच त्यामागे बोलविता धनी कोण होता हे प्रश्न तूर्त बाजूला ठेवले तरी बहुमत गमावल्यानंतर अधिकारावर राहण्याचा मुखर्जी मंत्रिमंडळाने हट्ट का धरावा हे समजण्यासारखे नाही. मुख्यमंत्री श्री. मुखर्जी विधानसभेची बैठक बोलवण्यास टाळाटाळ करीत आहेत असे आढळून आल्यानंतर राज्यपालांनी मुखर्जी मंत्रिमंडळ बडतर्फ करून त्याच्या जागी घोष मंत्रिमंडळाची स्थापना केली. या घटनेचा पश्चिम बंगालच्या सभापतींना एवढा राग आला की, त्यांनी विधानसभेची बैठक भरनाच कामा नये असे पवित्रे घेण्यास प्रारंभ केला. आपल्या पाठीमागचे बहुमत गेल्यानंतरही सत्तेवर राहण्याचा हा हव्यास

पाहिला की सत्ताबाजीचा काँग्रेसवर आरोप करणाऱ्या विरोधी पत्रांच्या धाडसाचे कौतुक वाटू लागते.

## लोकशाहीचे भवितव्य

उत्तर प्रदेशमधील संयुक्त विधायक दलातील अंतर्गत लाथाळी इतकी विकोपाला गेली होती की शेवटी चरणसिंगांना आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा देऊन बाहेर पडावे लागले. तेथेही लोकप्रतिनिधींनी असा काही गोंधळ घातला की अखेर राज्यपालांनाच पुढे होऊन सर्व सूत्रे आपल्या हाती घ्यावी लागली.

पंजाब, बंगाल, उत्तर प्रदेश आणि हरियाना येथे जसा विधानसभांचा अविक्षेप झाला तसा प्रकार बिहार येथे घडला नसला तरी अल्पसंख्य गटाकडे मंत्रिमंडळाची सूत्रे सोपवून तेथील लोकप्रतिनिधींनीही लोकशाही संकेतांचा अधिक्षेप केलेला आहे. या कृतीला तेथला काँग्रेस पक्ष जबाबदार आहे. श्री. महामायाप्रसाद सिन्हा यांच्या मंत्रिमंडळातील श्री. बी. पी. मंडल यांना मुख्य मंत्री होण्याची घाई झालेली आहे याचा अंदाज येताच बिहार काँग्रेसने मंडल यांना आणि त्यांच्या साथीदारांना शोषित दल नावाचा नवा गट स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. विधानसभा काँग्रेस पक्षाच्या पाठिंब्यावर आपला अल्पसंख्य गट सत्तारूढ होऊ शकेल अशी खात्री पटताच श्री. मंडल यांनी संयुक्त विधायक दलाशी घटस्फोट घेऊन आपला सवता सुभा स्थापन केला. बिहार काँग्रेसमधील एक महत्त्वाकांक्षी सदस्य श्री. महेशप्रसाद सिन्हा यांनी केवळ महामायाबाबूंना खाली खेचण्यासाठी मंडल यांना टेकू देण्याचे ठरविले. आपल्या तालावर नाचणारे मंत्रिमंडळ अधिकारावर यावे या हव्यासापायी महेशप्रसाद सिन्हा यांनी श्री. मंडल यांना पुढे करून ज्या कारवाया केल्या आणि त्यापायी पैशाची जी खैरात केली त्या संबंधीचा सविस्तर वृत्तान्त श्री. महामायाप्रसाद सिन्हा दिल्लीला आले असताना ऐकावयास मिळाला. इतर कोणत्याही संयुक्त विधायक दलापेक्षा बिहारमधील दल अधिक एकजुटीने कार्य करीत होते. अंतर्गत मतभेदाने ते फारसे पोखरले गेले नव्हते. त्यामुळे अखेरीस मंडल यांच्यासारख्या सत्ताकांक्षी व्यक्तीला हाताशी धरण्यावाचून काँग्रेसला गत्यंतर उरले नाही.

हे सर्व प्रकार पाहिल्यानंतर येनकेन प्रकारेण सत्तारूढ होण्यासाठी आणि हाती आलेली सत्ता हातातून जाऊ नये यासाठी काँग्रेससह सर्व राजकीय पक्ष एवढ्या खालच्या पातळीवर येऊ शकतात की, त्यापायी आपण आपल्या मूळ प्रतिज्ञेशी बेइमानी करीत आहोत याचेही त्यांना भान उरत नाही. तत्त्वनिष्ठेला तिलांजली देऊन केवळ सत्तास्पर्धेचा खेळ सुरू झाला की, केवळ लोकशाही यंत्रणेचाच नव्हे तर विवेकबुद्धीचाही राजरोस खून घडतो. प्रारंभी हा खेळ बरा वाटत असला तरी अखेर त्याची परिणती कशात होते हे इतर देशांच्या इतिहासावरून ध्यानी येण्यास हरकत नसावी. पण एवढा गंभीर विचार करण्याची आज तरी कोणाचीही इच्छा दिसत नाही.

**– सदाशिव पेठकर**

# विचार वारे

समीर

## □ आजचा इराण

हिंदुस्थानच्या जवळ असूनही ज्याच्याबद्दल सर्वसाधारण भारतीयाला फारशी माहिती नसते असा एक देश म्हणजे इराण. काही दिवसांपूर्वी एक तरुण इराणी इंजिनियर नादर हकीमी दिल्लीला आले तेव्हा त्यांनी आजचा इराण आर्थिक प्रगती साधण्यासाठी काय प्रयत्न करीत आहे, याची थोडक्यात माहिती दिली. इराणची अर्थव्यवस्था सर्वस्वी खनिज तेलावर अवलंबून आहे, असे पुष्कळांना वाटते. पण ते खरे नाही. अर्थात इराणमधला हा सर्वात मोठा उद्योग आहे ही गोष्ट खरी, व या उद्योगामुळे आर्थिक विकासाला आवश्यक असे इतर महत्त्वाचे उद्योगधंदे स्थापन करावयास मदत होत आहे. आजचा प्रगतिशील इराण आपल्या उद्योगीकरणात शक्य तेवढी विविधता आणायचा प्रयत्न करीत आहे. या महिन्यात सुरू होणाऱ्या इराणच्या चवथ्या पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्ट औद्योगिक विकासाची गती समतोल ठेवून वाढविणे हे आहे. "आम्ही कोठल्याही एका विशिष्ट अंगाला प्राधान्य देणार नाही." पोलाद, मशिनटूल्स, पेट्रोकेमिकल्स आणि अन्न या उद्योगांना विशेष महत्त्व देण्यात येईल. यावरून इराणचा विकास कसा अनेकविध होईल याची कल्पना येते. खनिज तेलापासून मिळणारे उत्पन्न शक्य तेवढ्या निरनिराळ्या क्षेत्रांत वापरायचे अशी मुख्य कल्पना आहे. "आम्हांला अशी आशा आहे की, कालांतराने या नवीन उद्योगधंद्यांपासून मिळणारे उत्पन्न खनिज तेलापासूनच्या उत्पन्नाइतकेच किंवा अधिकही होईल."

## □ इंडोनेशियाचे परराष्ट्रीय धोरण

इंडोनेशियाचे भारतातील राजदूत महंमद रशीफ यांनी नुकतेच दिल्लीत "इंडोनेशियाचे परराष्ट्रीय धोरण" या विषयावर भाषण केले, तेव्हा इंडोनेशियाच्या परराष्ट्र–धोरणाची पुढील प्रमुख अंगे असल्याचे सांगितले :

भारत : इंडोनेशिया व भारत या दोन देशांमध्ये प्राचीन सांस्कृतिक मैत्री असल्याने त्यांच्यांत "सहकार्य आणि सामंजस्य असणे" उघड आहे.

चीन : इंडोनेशयातील घातपाती क्रांतीला चीनने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत केली होती, हे सिद्ध झाले आहे. अजूनही नवीन इंडोनेशियन सरकारविरुद्ध घातपाती चळवळ करणाऱ्यांना चीन प्रोत्साहन देत असते.

आफ्रो-आशिया : समता, सहकार्य व परस्पर-मान या तत्त्वांच्या आधारे आफ्रो-आशियाई संघटन वाढले पाहिजे. पंचशील तत्त्वे अमलात आणण्यासाठी कोठलीही आशियाई-आफ्रिकन संघटना स्थापन झाली, तरी तिला इंडोनेशिया पाठिंबा देईल.

व्हिएटनाम : व्हिएटनामची समस्या तेथल्या लोकांनीच सोडविली पाहिजे. हा प्रश्न शांतिपूर्ण रीतीने सुटण्यासाठी आवश्यकता असल्यास त्यांनी इतर आशियाई देशांची मदत घ्यावी.

दक्षिण आशिया : दक्षिण आशियाई देशांत प्रादेशिक सहकार्य वाढले पाहिजे. जागतिक शांतता राखण्याच्या कामी तटस्थ देशांना महत्त्वाची कामगिरी बजवायची आहे. एखाद्या आंतरराष्ट्रीय लष्करी गोटात सामील होणे किंवा आपल्या भूमीवर परकीय लष्करी तळ ठेवू देणे या दोन्ही गोष्टी देशाच्या सार्वभौमत्वाला हानिकारक असल्याने इंडोनेशियाला त्या अमान्य आहेत.

## □ शेतकरी आणि हवामानशास्त्र

सोव्हिएट रशियातील हवामानशास्त्रज्ञ सबंध देशात किती धान्य पिकेल, याचा जो अंदाज बांधतात तो नव्वद टक्के बरोबर ठरतो, अशी आश्चर्यकारक माहिती भारतीय वेधशाळा पाहण्यासाठी आलेले दोन रशियन तज्ज्ञ प्रा. युरी किर्कॉव्ह आणि डॉ. बोरिस चुकालॉव्ह यांनी नुकतीच दिली. हवामानाचा अंदाज बांधण्याच्या तंत्रात सुधारणा झाल्याने आता कुठले धान्य एकूण किती पिकेल, याचा अंदाज पीक येण्याच्या तीन-चार महिने आधी करता येतो. पिकाचा अदमास करणे सोपे जावे म्हणून रशियात निरनिराळ्या ठिकाणी एकूण तीन हजार संशोधन-केंद्रांचे जाळे पसरण्यात आले आहे. भारतातही शेतकीसंबंधित हवामानशास्त्रांचे संशोधन " सुसंघटित " आहे. परंतु भारतीय शास्त्रज्ञांनी जमिनीतील दमटपणाबद्दल समतोल संशोधन करणे आवश्यक आहे. त्यासाठी या प्रकारचे संशोधन करणाऱ्या केंद्रांची संख्या वाढविली पाहिजे. सध्या भारतात अशी फक्त वीस केंद्रे आहेत. हवामानाच्या जागतिक प्रवाहावर पावसाचा काय परिणाम होतो, हे नीट कळल्याखेरीज भारतातील हवामानाचा दूरवरचा अंदाज बांधणे शक्य होणार नाही. मात्र भारतीय हवामानशास्त्रज्ञांचा अंदाज इतर देशांतील तज्ज्ञांच्या अंदाजाइतकाच बिनचूक असतो.

## □ औद्योगिक विकासात इंजिनियरांचे स्थान

दिल्लीची इंडियन टेक्नॉलॉजी बांधायला अगदी सुरुवातीपासून मदत करणारे ब्रिटिश तज्ज्ञ प्रा. स्पार्क्स आपण उभारलेल्या संस्थेची प्रगती पाहण्यासाठी भारतात आले आहेत, त्यांच्या मते कोठल्याही देशाच्या औद्योगिक प्रगतीत इंजिनियरांचा मोठा वाटा असतो. सध्या इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांत जो असंतोष माजला आहे, त्याबद्दल मत काय ? उत्तर : इंजिनियरिंग कॉलेजांवर होणाऱ्या खर्चात कपात करण्याची सूचना चुकीची आहे, यात मुळीच संशय नाही. " भारताला आणखी


खूप इंजिनियरांची आवश्यकता आहे आणि इंजिनियर काही एका रात्रीत तयार होऊ शकत नाही. त्याला वेळही लागतो व पैसेही लागतात." दिल्लीची इन्स्टिटयुट उभारण्याच्या कामी मदत करण्यासाठी ब्रिटिश सरकारने दहा लाख पौंड बाजूला काढले, यावरून इंजिनियरिंगचे शिक्षण किती महाग आहे, याची कल्पना येऊ शकेल.

## □ सीलोनमधील शिक्षण-व्यवस्था

भारतीय विश्वविद्यालयाची पाहणी करण्यासाठी नुकतेच येऊन गेलेले सीलोनी शिक्षणतज्ज्ञ डॉ. मालशेखर यांनी आधुनिक सीलोनी जनतेने–विशेषत: स्त्रियांनी– केलेली शैक्षणिक प्रगती आणि तेथल्या काही शैक्षणिक समस्या यांची थोडक्यात माहिती दिली. सर्वसाधारणपणे भारतातील व सीलोनमधील शैक्षणिक समस्या सारख्या वाटतात. तेथील शिक्षण–तज्ज्ञही सुशिक्षितांची बेकारी, भाषा, अपुरी कॉलेजे व कॉलेजातील अपुरी साधनसामग्री इत्यादी प्रश्न सोडविण्यात गुंतले आहेत. सीलोनमधील शिक्षण–मान एक जमाव सोडला तर सबंध आशियात सर्वाधिक म्हणजे ८८ टक्के आहे. "जगात सर्वांत प्रथम सीलोनी स्त्री प्रधान-मंत्री झाली या वरून आमच्या स्त्रिया किती प्रगत आहेत याची कल्पना येऊ शकेल. सीलोनच्या बहुतेक सर्व पुरुष प्रधान मंत्र्यांपेक्षा ती अधिक चांगली होती. आमच्या सुशिक्षित स्त्रिया घरी बसत नाहीत. आर्थिक आवश्यकतेमुळे त्यांना काहीतरी नोकरी करणे भाग पडते."

सीलोनी विश्वविद्यालयांतून हल्ली विद्यार्थ्यांची फार गर्दी होते ती कमी करण्यासाठी 'कॉरस्पॉन्डन्स कोर्स', त्यांना पूरक अशी रेडिओ भाषणे आणि संध्याकाळचे वर्ग सुरू करणे फायद्याचे होऊ शकेल. शिवाय सीलोन-मध्ये लवकरच 'ज्युनिअर युनिव्हर्सिटी कॉलेज' म्हणजे विश्वविद्यालय–पूर्वस्तराच्या व्यवसाय–शाळा सुरू करण्यात येणार आहेत. "भाषेचा प्रश्न आमच्याकडेही आहे. दहा वर्षांपूर्वी काही अतिरेकी राष्ट्रवादी मंडळींना वाटले की इंग्रजी हद्दपार करावी; पण सुदैवाने आता त्यांच्या विचारात फरक पडत चालला आहे." पुढील पाच वर्षांत साहित्यिक स्वरूपाचे विषय सिंहली व तमीळ या मातृभाषांतून देण्यात येतील. (– सुदैवाने आमच्या शेजारी मद्रासला फार चांगली तमीळ पुस्तके निघतात व आम्ही ती वापरतो.) "परंतु डॉक्टरी, इंजिनियरिंग, कायदा इत्यादी व्यावसायिक विषयांचे शिक्षण मात्र आणखी बरीच वर्षे इंग्रजीतून द्यावे लागेल."

○



आचार्य रजनीश

# प्रवचन

दोन प्रहर. भरपूर उजेडाचे प्रशस्त दालन. काही खुर्च्या, काही गाद्यागिर्द्या, थोडे कोच. एक व्यासपीठ. उदबत्त्यांचा उग्र सुगंध. बरीच उत्सुक माणसे.

स्वामीजी येणार आहेत.

त्या स्थितीत कल्पनेने स्वामीजी म्हणजे केव्हातरी दिसलेले एक छायाचित्र आठवून एक भव्य, जरबदायक, तेजःपुंज व्यक्तिमत्त्व भासते. छतापर्यंत उंच, दाढीमिशांच्या घुक्याने वेढलेले, आरपार बघणारे लालसर टपोरे डोळे, सरळ धारदार नाक, उन्नत रुंद छाताड, मोठे मोठे बाहू, निरहंकारी उद्दाम चाल आणि पृथ्वीच्या गर्भातल्या हुंकारासारखा शब्द.

स्वामीजी येतात.

# रा । त । रा । णी ।

## वि ज य । तें डु ल क र

सुटसुटीत, आटोपशीर आणि सौम्य व्यक्तिमत्त्व. व्हिस्टाव्हिजन, सुपर पॅनाव्हिजन अशा एखाद्या प्रचंड पडद्यावरच्या रंगीत चित्रपटातला कोणी लगेच थिएटरबाहेर भेटावा तितका फरक. मुद्रा देखणी, गंभीर, अंतर्मुख पाणीदार डोळ्यांत सौम्य तेज. कुरळ्या दाढीमिशा. स्वास्थ्य दाखविणारी कांती. कमरेला शुभ्र लुंगी. अंगाभोवती शुभ्र वस्त्र. हालचालीत डौल आणि साधेपणा. नजर दुखावणारा एकही तपशील नाही.

व्यासपीठावर येऊन ते मर्यादशीलपणे बसतात.

वातावरण गंभीर बनते. काही व्यापारी, काही साहित्यप्रेमी असा संमिश्र व्यवहारी श्रोतृसमाज आपल्या स्वतंत्र चर्चा आवरून व्यासपीठाकडे एका वेळी नजरा एकवटतो.

जळत्या उदबत्त्यांच्या गंधाने भरणाऱ्या वातावरणात स्वामीजींचा परिचय करून दिला जातो. 'आचार्य रजनीश यांचे मी स्वागत करते ... त्यांच्याविषयी सांगायचे म्हणजे...' लक्षपूर्वक तेही तो परिचय ऐकताततसे वाटते. तेही कोणा आचार्य रजनीशनामक स्वामीचा परिचय करून घेण्यासाठी तेथे आल्यासारखे वाटतात. मध्येच कधी कधी ते स्वतःत खोल खोल बुडतात. पुन्हा क्षणात स्वतःला स्वतःतून बाहेर काढून उपस्थितांना आणि प्रवचनस्थानांना ओझरत्या पण शोधक दृष्टीने न्याहाळतात.

परिचय करून देणाऱ्या परीटघडी शुभ्र वस्त्रातल्या बाई, स्वामींनी दिलेला एक दृष्टान्त श्रोत्यांना भारावल्या, विनम्र, आदरभरल्या स्वरात वानगीदाखल सांगतात. स्वामींचे नाव, गाव, वय व वंशवृक्ष बिनमहत्त्वाचाच. त्यांचा परिचय म्हणजे त्यांच्या श्रद्धाविचारांचाच परिचय.

एक मूल होते. ( व्यासपीठावरल्या, दाढीमिशांत लपलेल्या मुलासारखे ? ) त्याला ध्यास लागला स्वतःच्या सावलीचे डोके पकडण्याचा. सावलीमागे ते फिर फिर फिरले. हात लांबवूनही सावलीच्या डोक्याला पोचेनात. धावूनही सावली जवळ येईना. अखेर ते मूल थकले. निराश झाले. (हे तर श्रोतृसमुदायातले आम्हीच सर्व !) रडू लागले. तेथून जात होता एक वृद्ध भिक्षू. (व्यासपीठावर मूलपण पांघरून बसलेला ?) त्याने त्या मुलाला रडताना पाहून (पाहा बेटा आम्ही रडती मुले असल्यासारखा व्यासपीठावरून आम्हाला पाहतो आहे !) त्याला म्हटले,

तू का रडतोस ? मूल म्हणाले, मला माझ्या सावलीचे डोके काही केल्या धरता यत नाही. भिक्षू म्हणाला, तू त्यासाठी काय केलेस ? मूल म्हणाले खूप हिंडलो, धावलो. धावून धावून पाय अगदी दुखले. भिक्षू म्हणाला, आता आहे तिथेच उभा राहा आणि स्वतःच्या डोक्याला हात लाव. मुलाने तो सहजी लावला. भिक्षू म्हणाला, आता तुझ्या सावलीकडे पाहा. मूल पाहते तो सावलीचेही डोके त्याच्या हाती आलेले ! मूल आनंदले. इतकी साधी गोष्ट आपल्याला कशी सुचली नाही याचे त्याला आश्चर्य वाटत राहिले.

बोध ? जे तुम्ही त्रिखंडात शोधता आहा ते तर तुमच्यापाशीच आहे. आधी आत्मज्ञान करून घ्या की ब्रह्मज्ञान झालेलेच असेल.

नवीन काहीच नाही. आजवर सर्व साधुसंतांनी वेगळे काय सांगितले ?

सांगणे वेगळे नाहीच. ते थोडेफार पटवण्याचा हा एक नवा प्रयत्न. प्रकाश आहे हे नव्या अंधळ्यांना जाणवून देण्याची ही नवी कोशिस. किंबहुना डोळे उघडा हेही या अंधळे नसलेल्या अंधळ्यांना वारंवार सांगण्याची ही जिद्दी खटपट. पुष्कळशी विफल. क्वचित सफल.

## एक भ्रम

आम्ही आंधळे डोळे का उघडू इच्छित नाही ? ब्रह्मज्ञान का करून घेत नाही ? आम्ही ब्रह्मज्ञानी झालो तर या साधूमंडळींची मग काय मातब्बरी राहील ? जगू द्या, त्यांनाही जगू द्या. शिवाय, आंधळ्यांच्याही काही सोई असतात. आमचेही ठीक चालते साधुमहाराज, जमलेल्यांच्या चेहऱ्यांकडे पाहा. काही फार लीन दिसतात, ते अशा प्रसंगी असे दिसायचे असते म्हणून. मनातून तेही तुमचे वजन जोखताहेत. अपेक्षेइतका प्रभावी नाही. मागच्याहून जरा उजवा एवढेच. पण त्या अमक्या तमक्याची सर याला नाही. तो म्हणे तोंडातून शिवलिंग आणि कानातून अंगठ्या काढतो. ती बाकी कमालच.

स्वामीजी प्रवचनाला आरंभ करतात. आत्मबोध. बजवैय्या प्रथम वाद्य सुरात लावतो तसे स्वामीजी आपल्या विचारधारेचा सूर मनाशी प्रथम नीट जमवून घेतात. मग एकेक मोजका हिंदी शब्द गुजराती वळणाच्या उच्चारांनिशी टाकीत प्रवचनाला सुरुवात होते. 'अँहंकार' हा यात वारंवार येणारा शब्द. शब्द न उच्चारता या अर्थाचे आम्ही पदोपदी जगतो. स्वामीजी म्हणतात, हा आधी गेला पाहिजे. आणि हा मुद्दाम काढून फेकण्याचा सवालच नाही, कारण मुळातच तो खोटा आहे. तुम्ही मानलेला एक भ्रम आहे. हा भ्रम तुम्हांला नीट दिसताक्षणीच दूर होईल आणि 'अँहंकार' संपलेला असेल. तो फक्त नीट जाणा–पुढचे सर्व आपोआप घडेल.

पुन्हा एक दृष्टान्त येतो. (हा गृहस्थ गोष्टी फार चांगल्या निवडून त्या सांगतोही चांगल्या !–गोष्टीतला मथितार्थ कानाबाहेर टाकून आमचे त्याच्याविषयीचे एक बरे मत ! हा आमचा 'अँहंकार' काय स्वामीजी ?)

एक दगड उंच जात होता. जमिनीवरच्या दगडांना म्हणाला, मी उंच निघालो आहे. वस्तुत: तो उंच फेकला गेला होता पण तसे सांगणे किंवा स्वत:शी मानणेही त्याच्या 'अहंकारा'ला मानवणारे नव्हते. तो म्हणाला, मी उंच निघालो आहे. तो दगड काचेवर बसला. काच फुटली. दगडाने काच फोडली हे खोटे. दगड आणि काच एकत्र आली की काच फुटते, हे सत्य. पण दगडाला कृतकृत्य वाटले. तो म्हणाला, पाहा, मी काच फोडली ! दगड आत जाऊन बिछायतीवर पडला. बिछायत तर आधीचीच होती. दगड चुकून, यदृच्छेने येऊन तिच्यावर पडला, हे सत्य. परंतु दगडाला केवढा संतोष झाला ! तो म्हणाला, वाहवा ! काय हे माझे या घरात आदरातिथ्य ! मी येणार हे आगाऊ जाणून माझ्यासाठी बिछायतीची तजवीज-देखील करण्यात आली ! बिछायतीचा आराम तो दगड, उंच जाऊन काच फोड-ल्याच्या महान पराक्रमानंतर जरा विश्रांती घेत आहे तो घराच्या मालकाचे लक्ष त्याच्याकडे गेले. मालकाने दगड उचलला. दगडाला वाटले, खुद्द मालकाने आपल्याला उचलून घेतले. केवढी आपली असामान्य लायकी ! आणि मालकाने दगड बाहेर भिरकावला. दगड पुन्हा इतर दगडांत जाऊन पडला. पण पडतानाही म्हणाला, दोस्तांनो, पुन्हा तुमच्यात आलो. एवढी झेप घेतली, एवढे कर्तृत्व केले, एवढे वैभव उपभोगले, एवढी मान्यता मिळवली पण शेवटी कळले की काही खरे नाही. आपली धूळच बरी ! म्हणून सर्व सोडून तुमच्यात आलो आहे.

### निर्भेळ आनंद

उपस्थित 'दगड' चाळवतात. न कळत माना डोलवतात. एकमेकांना पाहून घेतात. आपण सोडून दुसऱ्या दगडांची ही गोष्ट सर्वांना वाटत असावी. गोष्टीतल्या दगडाने, नाही म्हटले तरी, मनांची डबकी ढवळून निघतात. पण दगड गिळून पुन्हा कशी छान नितळ दाट होतात. चाळवलेल्या मुद्रा पुन्हा मख्ख मुलायम बनतात.

स्वामीजी अस्खलित, तद्रूप, सुसूत्र आणि भारलेल्या शैलीने बोलत राहतात. आपण करतो हे खोटे. सर्व काही घडते. अहंकार ही नशा आहे. सर्व नशा वाईट. कारण त्या 'स्वयं'ला विसरण्यासाठी असतात. दारूची नशा वाईट तशी संगीता-


उत्कृष्ट इन्-डोअर व औट-डोअर फोटोग्राफीसाठी संपर्क साधा

**साधना फोटो स्टुडिओ**

सोन्या मारुती चौक, लक्ष्मी रोड, पुणे २

फोन : २६४०१

चीही नशा, ती स्वतःचा विसर एखाद्याला पाडीत असेल तर, वाईटच. स्वतःला विसरण्याचा प्रयत्न करू नका. (प्रवचनाच्या नशेत स्वतःला विसरलेले मोजके भाबडे भक्त, स्वामीजी, तुम्हाला दिसताहेत का ?) स्वतःला फार काळ विसरता येत नाही. कारण 'स्वयं' अखेर सत्य आहे. हे सत्यच जाणा. 'स्वयं'मध्ये खोलवर आणि आतवर पाहा. त्यानेच खरे आत्मज्ञानी होता येते. खरा आनंद तिथे आहे.

स्वामीजी पुरते गोष्टीवेल्हाळ आहेत. गोष्टींचा लळा ते श्रोत्यांना लावून आपले विचार त्यांच्या 'स्वयं' पर्यंत पोचवता आले तर पाहतात. स्वामी असून मुत्सद्दी माणूस ! निदान मानसशास्त्र-विशारद नक्कीच. स्वामीजी वेड लावणाऱ्या पाण्याच्या विहिरीची गोष्ट सांगतात. प्रजा त्या विहिरीचे पाणी पिऊन वेडी झाली. राजा स्वतःला भाग्यवान समजत होता. त्याची एकटयाची वेगळी विहीर होती. तो शहाणाच राहणार होता. पण पुढे तमाम वेडी प्रजा शहाण्या राजालाच वेडा म्हणू लागली ! राजा वेडा ठरला आणि प्रजा शहाणी. तात्पर्य : हे सारेच भ्रम. 'अॅहंकारा'चे एकेक खेळ. एक मोठा गवई होता. विक्षिप्त होताच. त्याचा हट्ट की आपल्या बैठकीत कोणी मान डोलावता कामा नये. राजा म्हणाला, तू गा. कोण मान डोलावते पाहतो ! बैठकीत मान डोलवील त्याची गर्दन छाटण्यात येईल असे फर्मान काढतो. बैठकीपूर्वी या बोलीवर श्रोत्यांना बैठकीत येऊ देण्यात आले. राजा लक्ष ठेवून ते राहिला. प्राणभयाने श्रोते निश्चल होते. पण गाणे रंगले तशी स्वराच्या नशेत जो तो भवितव्याचा विचार विसरून माना डोलवू लागला. तात्पर्य : नशा माणसाला विचार विसरण्याला लावते.

सर्व नशा वाईट हे सांगणाऱ्या प्रवचनाची नशा उपस्थित बहुतेकांवर एव्हाना बऱ्यापैकी चढलेली असते. मधुर, वेचीव शब्द, गोंडस उच्चार, ओघवती भावपूर्ण शैली, मोहक युक्तिवाद आणि आकर्षक व्यक्तिमत्त्व या सगळयांची जादू चेहरा न् चेहरा कमजास्त भारून राहिलेली असते. माना डोलत असतात.

आणि प्रवचन समाप्त होते. आर्जवी, रेखीव, गोंडस, मंतरल्या शब्दांचे तरल शरीर ल्यायलेला स्वामी हे शरीर टाकून जणू पुन्हा जड देहात आलेला वाटतो. सर्वांच्यावतीने विधात्याला प्रणाम करून अभिवादनपूर्वक तो उठतो. व्यासपीठावरून उतरतो. प्रश्नोत्तरांचा आधी ठरलेला कार्यक्रम करण्याला त्याला वेळच नाही. तोही 'बिझी' आहे ! अंधळे आपापले डोळे घट्ट झाकण्यात बिझी आहेत तर डोळस स्वामी त्यांना डोळे उघडा, डोळे उघडा म्हणून परोपरीने सर्वत्र फिरून सांगण्यात बिझी ! अॅहंकारा'ची दोन्ही टोके कार्यमग्न आहेत. वर्क इज इन प्रोग्रेस ! (रोड क्लोज्ड.)

स्वामी पुढच्या कार्यक्रमाला लगबगीने जातात, मागे कुणीतरी कुणालातरी विचारीत असते, मग ? अहंकार कधी सोडता ? सोडा, सोडा.

दुसरा त्याला म्हणतो, श् श् श् सोडण्याचे नाव नको. नशा वाईट ! ▫



**वय वर्षे छपन्न. नाव–शांताबाई चक्रदेव**

२

व्यक्तिदर्शन

एका बिऱ्हाडाचा दिवाणखाना.

या कोण आल्या ?

भारताच्या पंतप्रधान ? की अखिल भारतीय महिला परिषदेच्या अध्यक्षा लेडी कुणीतरी ?

छे छे. पण अशाच तोऱ्यात एक चिरगूट शालीसारखे अंगावर घेतलेल्या गबाळ्या ' काकू ' दिवाणखान्यात प्रवेश करत्या होतात.

काकूंच्या डोळ्यांचे देवदयेने जन्मत:च बिनसलेले आहे. त्यांचे तोंड त्या सदा हसतमुख असाव्यात असा गोड गैरसमज निर्माण होण्याइतके उघडे राहते.

काकू येतात. बरोबर चि. ठकू आहे. येऊन काकू बैठक घेतात ती जमिनीवर. मुडपल्या पायांच्या दोन चवड्यांवर स्वत:ला अल्लद तोलून त्या सुखाने बसतात. मग अस्सल ब्राह्मणी शैलीत बोलू लागतात.

काकूंच्या ठकूचे नुकतेच लगीन झाले आहे. (पण अजून ती ' तू नाव घे ' असे आईला

सांगण्यासारखे बालिश हट्ट करते आणि काकूही तिला थपडा आणि धपाटे लगावतात. ठकू स्वरूपसुंदर (तिच्या वडलांसारखी–काकू.) आहे; त्यामुळे तिला नवराही मोठा हुद्देदार मिळाला आहे आणि काकूंना आपल्या जावयाचा अभिमान आहे. काकूंचे जावई रेल्वे लैनमध्ये असतात. गाड्यांना दिवा दाखवण्याचे काम ते करतात. त्यांनी दिवा दाखवला नाही तर गाड्या खोळंबून राहतात. ठकूला घऊन काकू ओळखीच्या सर्व सुस्थित घरी फिरताहेत. ठकूला उखाण्यासकट नाव घ्यायला लावताहेत, मग रीत म्हणून घरच्या यजमानीणबाई ठकूला–आणि क्वचित तिच्या मातृदेवतेलाही–कापडचोपड देतात. खाणेपिणेही होते. जावयांसाठी त्यातले आणखी मागून बांधून बरोबर न्यायलाही काकू विसरत नाहीत.

## काकूंविषयीची सहानुभूती

काकू कोण ? वेदशास्त्रसंपन्न गुंडोपंत यांच्या या पत्नी. त्यांची मुलगी ठकू, राहणार 'गिरगाव बाक् रोड'. थोडक्यात मुंबईच्या वकाल वसतीत एका जुनाट चाळीत राहून जेमतेम पोट भरणाऱ्या एका गरीब भिक्षुकाची ही बुभुक्षित, हपापली बायको. शिक्षण शून्य. घराबाहेरचे थोडेफार जग पायाखालचे असले तरी त्याचे संस्कार नाहीत. घरोघरच्या अन्नावरच उभा जन्म गेलेला त्यामुळे काहीही कोडगेपणाने मागण्याला संकोच नाही. फार भावडी–तुमच्या जावयांचा हुद्दा फार बडा हो, तुमची ठकू सुस्थळी पडली, काकू–असे ओळखी–पाळखीच्या बायका म्हणत तेव्हा प्रथम प्रथम काकूंना वाटे या कुत्सितपणे बोलतात. पण मग एकदा वे. शा. सं. गोंदूभटजी सहकुटुंब यात्रेस गेले असता दिवा दाखवणाराने दिवा दाखवला नाही तर गाडी बिनशर्त कशी खोळंबते त्याचे प्रात्यक्षिक काकूंनी देखता डोळा पाहिले आणि बायका बोलतात ते मनापासूनचे आहे याविषयी त्यांची पुरेपूर खात्री पटली. तरी हे सर्व अघळपघळपणे सांगताना मध्येच त्या विचारतात, आहेत ना हो जावई आमचे मोठे ? हो, आहेतच हो मोठे. काकूंनाही कुठेतरी याविषयी उगीच थोडी शंका आहे.

परिस्थितीमुळे काकू तोंडाला लाळ सुटण्याइतक्या बुभुक्षित आहेत. लग्नाला कुणाला न बोलवता घरोघर ठकीसह जाऊन अहेर आणि खाणेपिणे वसूल करण्याइतक्या बेरकी आहेत, पण त्या भावड्याही आहेत. त्यांचे बोलणे, वागणे हसवते त्याहून अधिक सहानुभूती निर्माण करते. त्यांचा राग येण्याऐवजी त्यांच्याविषयी कणव जागी होते. त्यांच्या परिस्थितीत आपलेही कदाचित तेच झाले असते असे आत कुठे तरी वाटून जाते.

यजमानीणबाईंचा निरोप घेऊन काकू दिवाणखान्यातून स–ठकू गमन करत्या होतात.

आता येतात 'सासूबाई.' साक्षात् डोंगर चालावा तसे यांचे व्यक्तिमत्त्व अवाढव्य, डळमळते आणि एखाद्या निवृत्त परदेशी सरसेनापतीची आठवण देणारे. कोकणातून

हा वाण डायरेक्ट दिल्लीत मुलाकडे येऊन पोचला आहे. सुधारलेले 'थेर' करणाऱ्या दिल्लीकर सुनेशी मनमोकळे बोलणे होऊ शकत नाही. मुलाने ऑर्डर काढली आहे की आईने उगीच शेजारीपाजारी जायचे नाही. उगीच लोकांना थट्टा-मस्करीला निमित्त नको हा यामागला उद्देश. तरीही सासूबाईंनी सुनेचा डोळा चुकवन शेजारचे एक बिऱ्हाड गाठले आहे.

एकीकडे बारीक नजरेने सर्व काही पाहात सुनेविषयी सानुनासिक शैलीतल्या छुप्या कागाळचा आणि मुलाविषयी प्रशस्ती आणि नापसंती यांनी त्या हां हां म्हणता शेजारणीचे घर कसे भरून टाकतात. बसा—बसाच्या आग्रहावर 'बसतेच आहे हो' 'ही काय बसतेय' असे दिलासे एकीकडे देत शरीराचा बिनघडीचा डोंगर हप्त्याहप्त्यांनी त्या एकदाचा भुईला भिडवतात तेव्हा आपल्याला कृतकृत्य वाटते. पुन्हा उठताना हीच सर्व तकलीफ नव्याने. अधेमध्ये दिल्लीविषयी त्या मत-प्रदर्शन करतात. दिल्लीकर बायकांवर टीका करतात. कोणताही विषय त्यांना वर्ज्य असू शकत नाही.

## गुरुजी

त्या जातात आणि एक बिनदातांचे वयोवृद्ध 'गुरुजी' येतात. ही 'असामी' पहिल्या दोहोंहून संपूर्ण वेगळी. काही विशेष धार्मिक समारंभाच्या आखणीसाठी त्यांना निमंत्रण पाठवून बोलावून घेण्यात आले आहे. समारंभाचे बजेट त्यांचे यज-मानच ठरवून त्यांना सांगून टाकतात. ते फारच सुटसुटीत आहे. त्यात अनेक विधींना आणि त्या पाठच्या खर्चांना चाट देण्यात आली आहे. 'चोरांहातची लंगोटी' या न्यायाने 'त्याची गरजच नाही' 'ते होईल! तर काय!' 'भागवू' 'वेळ निभल्याशी कारण' असे म्हणत गुरुजी हे सगळे बजेट आदरपूर्वक बिनशर्त मान्य करतात आणि एकीकडे त्याच वेळी यजमानांसमोर मांडा घालून हल्लीच्या एकंदर कठीण परिस्थितीवर आणि वाढत्या चैनी, आणि धर्मलंड प्रवृत्तीवर आपले संस्कृतप्रचुर टीकास्त्र दात नसलेल्या तोंडाने सोडतात. उपस्थित यजमानांविषयीची अतीव आदब आणि एकंदरीने नव्या जगाविषयीची तीव्र नापसंती यातली कसरत एकात दुसरे मिसळू न देता ते अशी काही करतात की ऐकताना हसता हसताच या चतुर उपजीविकावादी माणसाविषयी आदर वाटतो.

या तीनही व्यक्ती एकमेकींपासून वेगळचा, आपापले स्वतंत्र गुणधर्म वागविणाऱ्या. परंतु या थोडचा थोडचा अवधीच्या अंतराने, एका बिऱ्हाडाच्या दिवाणखान्यात हात दोन हातांच्या अंतरावरून प्रभावीपणे जिवंत करणारी व्यक्ती मात्र एकच. या व्यक्तीचे वय वर्षे—छप्पन्न. व्यवसाय—गृहिणी. नाव—शांताबाई चक्रदेव.

काही दिवसांमागे एका संध्याकाळी या तीन व्यक्तींचे दर्शन घडले आणि दिल खूप झाला. मोजकीच माणसे. अनौपचारिक वातावरण. ती तिकिटांची रांग नाही, ते थिएटरवर तडमडत पोचून खुर्ची शोधणे नाही, रंगमंच आणि प्रेक्षागारातला

दुरावा नाही, पडदा नाही, आडपडदा नाही, काही नाही. सारे घरगुती, सुखाचे आणि तरी तिकीट काढून रंगमंचावर पाहावे इतके रसरशीत आणि कलापूर्ण.

## व्यक्तिदर्शन एक कला :

व्यक्तिदर्शन ही कला आहे, 'नकला' नव्हे हे आता तुम्हाआम्हाला मान्यच आहे. कै. भोंडे हे या रंजन माध्यमाला नकलेपासून खेचून कलेचा दर्जा देणारे प्रतिभाशाली व्यक्तिदर्शनकार आज आपल्यात नाहीत तरीही त्यांची व्यक्तिदर्शने ज्यांनी एकदा पाहिली त्यांना ती विसरणे शक्य नाही. त्यांची व्यक्तिदर्शने नकलेसारखी तकलादू नसत; त्यातून जिवंत, चैतन्ययुक्त माणसे उभी राहात. पु. ल. देशपांडेदेखील आपल्या एकपात्री प्रयोगात व्यंग्यचित्रांच्या स्वरूपात पण असंख्य गहिरी व्यक्तिदर्शने घडवतात. सदानंद जोशी हे या माध्यमातले आणखी एक उल्लेखनीय नाव. परंतु ज्यांची नावे कवी वृत्तपत्रांतून किंवा नाट्यगृहांच्या बाहेर व्यक्तिदर्शनकार म्हणून झळकत नाहीत अशीही कितीतरी गुणी माणसे आहेत. गायक नट म्हणून आजकाल गाजणारे वसंतराव देशपांडे हे एक उत्तम व्यक्तिदर्शनकार आहेत हे फक्त त्यांच्या रोजच्या बैठकीतल्यांनाच ठाऊक आहे. कथा–कादंबरीकार व्यंकटेश माडगुळकर हे असेच दुसरे बैठकीतले व्यक्तिदर्शनकार. त्यांचे वडील बंधू ग. दि. माडगुळकर यांचेकडेही या माध्यमाचे फार संपन्न भांडार आहे. परंतु हे झाले एक ना एक क्षेत्रात नाव केलेले व्यक्तिदर्शनकार. जे अगदी मामुली माणसे म्हणून जगताहेत असेही कुणी कुणी अनपेक्षितपणे या माध्यमातला आपला गुण प्रसंगोपात दाखवून चकित करतात. आरंभी ज्यांच्या व्यक्तिदर्शनाविषयी लिहिले त्या शांताबाई चक्रदेव यापैकीच. मुंबईत महिलामंडळाच्या कार्यक्रमांतून त्या आतापर्यंत तुरळक चमकल्या आहेत. बाळपणी पुण्याच्या पैसाफंड मेळ्यातून कामे करून त्यांनी अभिनयाचे पहिलेवहिले धडे घतले. नंतर सासरही असे मिळाले, जिथे प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे या मुलीचे कलागुण जोपासणारे वातावरण राहिले. सध्या चक्रदेव कुटुंबाचे सर्व सदस्य आपापल्या परी व्यक्तिदर्शन–कलेत रस घेतात. आईकडून तालमी घेऊन मुलाने नुकते एका कार्यक्रमात सोवळ्या बाईचे सोंग काढून लोकांना खूष केले. चक्रदेवबाई अभिमानाने म्हणाल्या की केवळ मी शिकवलेलेच त्याने केले नाही. आयत्या वेळी शेजारी कुणी तरी मुसलमानाच्या सोंगातला येऊन उभा राहताच याने 'हा मेल्यांनो' म्हणत दुसरी बाजू गाठलीन आणि तिथे फणकारून उभा राहिला त्यासरशी टाळ्या पडल्या. आणखी एका कार्यक्रमात चक्रदेव कुटुंबाचे झाडून सर्व मेंबर दाक्षिणात्य सोंग घेऊन उतरले होते. बायकांच्या एका उत्सवी नाटकात चक्रदेवबाई गड्याच्या सोंगात गाजल्या. मूक नाट्याच्या एका स्पर्धेत पूतनामावशी होऊन त्यांनी बक्षीस पटकावले. त्यांना सिनेमातही बोलवत होते पण त्या गेल्या नाहीत. व्यक्तिदर्शनकारांच्याच या बिऱ्हाडी फार कंटाळा आला म्हणजे रुचिपालट म्हणून बहुधा एखाद्या दिवशी माणसे स्वत:सारखी वागत

असतील, अशी उगीच एक कल्पना करावीशी वाटते !

असे काही गवसले की वाटते, हे हजारो लोकांसमोर थिएटरातून का नये होऊ ? कोणत्या बाबतीत हे कमी किंवा डावे आहे ? पण मग एक लक्षात येते. हा रंग-रंगोटी करून आणि वेषांतर करून प्रकाशझोतात एका कृत्रिमपणे खरा भासवण्याचा मामला नव्हे. हे तर मुळातच फार खरे, फार रसरशीत असे काही आहे. जितक्या जवळून पाहावे तितके अधिक सच्चे, चैतन्ययुक्त आणि आनंददायक. याला रंगमंच आणि प्रेक्षागृह यांतले 'सुरक्षित अंतर' कशासाठी हवे ? उलट या अंतराने यातले अनेक गहिरे तपशील आमच्यापासून लपतील. उदाहरणार्थ, चक्रदेवबाईंची दिल्लीची 'भिखारन' घ्या. ब्रज भाषेतली कृष्णाची गोड गाणी भयानक भसाड्या आवाजात अलिप्तपणे ओरडत एकीकडे केसांतल्या उवा शोधून मारणाऱ्या आणि या दोन उद्योगांत मध्येच माणूस हेरून भीक मागणाऱ्या या जन्मजात भिकारणीतली गंमत हात दोन हाताच्या अंतरावरूनच घ्यायला हवी. तोंडात कृष्ण, हातात ऊ आणि नजरेत याचनेसाठी नवे संभाव्य सावज अशी तीन अवधाने एका वेळी यशस्वीपणे सांभाळताना ही चक्रदेवबाईंची भिखारन जे जे काही करते, ते मायक्रोफोन्स, प्रकाश-योजना, नेपथ्य, यात खुलणार नाही, गुदमरेल. 'काकू'च्या जन्मतः बिनसलेल्या डोळ्यातली भाबडी गंमत, सासूबाईंची बैस–ऊठ, बोळके गुरुजींची लाचारी आणि सात्त्विक संताप एकत्र, हे सारे थिएटरासाठी नव्हेच, हे बैठकीतच खुलणारे आहे. चक्रदेवबाईंच्या पोतडीतली ही माणसे लांबून पाहण्याची नव्हेतच; ती दोस्ती करण्याची माणसे.

यांची व्यक्तिदर्शने घडवून बाईंनी आम्हाला निरोप दिला, पण बाई नसल्या तरी ही स्वतःला नकळत लोभस बनलेली माणसे आमच्याबरोबरच आहेत. आमच्यात आहेत. आमची त्यांना अंतर देण्याची तयारी नाही.

व्यक्तिदर्शनाचे यश आणखी ते कोणते म्हणता येईल ?

○


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.


सु. ल. सोमण

# तरीही समाज स्वस्थच!

**सहा हजार मैलावरून आलेल्या त्या पाद्रयाने ज्याचे गुण ओळखले, त्यालाच आमच्या समाजाने मात्र ठोकरले, आता त्याला नवी शक्ती प्राप्त झाली होती. जी आमच्या मुळावर घाव घालून आमच्या संस्कृतीचे लचके तोडणार होती. आणि आमचा समाज हे सर्व निष्क्रियतेने बघत राहणार होता.**

रमेशचा आणि माझा आता तसा काही संबंध नाही. चार वर्षांपूर्वी मी त्याला पोर्तुगीज चर्चच्या नाक्यावर भेटलो, तो शेवटचाच. त्याच दिवशी त्याच्याविषयीची माझी उत्सुकता मावळली. त्यानं उघडलेलं एक प्रकरण त्याच दिवशी संपलं. त्या गोष्टीला आज चार वर्षांहून जास्त काळ लोटला आहे. गेल्या चार वर्षांच्या काळात मला रमेशची आठवण होत नव्हती अशातला भाग नाही; पण आता ह्या घटकेला मात्र ती प्रकर्षाने होत आहे, आणि ह्यानंतरचे दोन-तीन तास मला अतिशय उदासवाणं वाटणार आहेत हेही निश्चित.

आता तीन वाजता घाईघाईने बाहेर पडेपर्यंत, सकाळपासूनच्या संपूर्ण दिवसात रमेशचा विचारदेखील माझ्या मनात डोकावला नव्हता. घाईघाईने घराबाहेर पडलो एका मुलाखतीची वेळ पाळण्यासाठी, आणि लक्षात आले जोड्यावर पॉलिशची लकाकी चढणं आवश्यक आहे. चौकातल्या एका पॉलिशवाल्याच्या खोक्यावर माझा बूट विराजमान झाला. जोड्यावर ब्रश फिरू लागला, हलके हलके जोड्याचं स्वरूप पालटू लागले. मध्येच खोक्यावर 'टक् टक्' करून पाय बदलण्याची सूचना दिली गेली. यांत्रिकपणेच मी पाय बदलला. पुन्हा एकदा जोड्यावरून हात फिरू लागला. मन गुंगू लागलं, वाटलं—रमेशचाच हात फिरतोय जोड्यावरनं. ब्रश छे! जोड्यावरनं पॉलिशचा हात फिरत होता, पण त्यात ती चिरपरिचित आत्मियता नव्हती; ती तळमळ, ती जीवनाशी झुंज



घेण्याची जिद्द, आणि ह्या साऱ्या गोष्टींमुळे आलेली ती सहज सफाई—साऱ्या साऱ्याचा अभाव होता इथे ! छे, छे ! हा हा रमेशचा हात असूच शकत नाही; त्यानं केव्हाच आपल्या वाटचालीचा मार्ग बदलला आहे. तो आज वेगळं जीणं जगतो आहे, आणि मला, माझ्या समाजाला वाकुल्या दाखवतो आहे……

मला काही विशिष्ट अशा सवयी आहेत. माझं चौकातलं ईराण्याचं हॉटेल ठराविक आहे, टेबल ठराविक आहे. किराणा माल एका ठराविक दुकानाखेरीज दुसऱ्या ठिकाणाहून मी सहसा आणत नाही. माझी दुकानं, माझी जाण्या-येण्याची ठिकाणं—सारं, सारं काही ठराविक आहे. त्यात मी सहसा बदल करीत नाही. पाच वर्षांपूर्वीही ह्याच माझ्या सवयी होत्या. पण त्या दिवशी काय जादू घडली कोण जाणे, माझ्या ह्या ठराविकपणाला खो मिळाला. नेहमीप्रमाणे संध्याकाळी त्या नेहमीच्या चौकात आल्यावर पॉलिश करून घेण्यासाठी मी माझा मोर्चा पॉलिशवाल्यांच्या रांगेकडे वळवला. पण नेहमीच्या पॉलिशवाल्याकडे लक्ष जाण्यापूर्वीच तिथे आज नव्यानेच आलेल्या एका तेरा-चौदा वर्षे वयाच्या मुलानं माझं लक्ष वेधून घेतलं. खाकी अर्धी विजार नि पांढरा शुभ्र शर्ट आत घातलेला—तो नवीन मुलगा त्या रांगेत अगदीच वेगळा दिसून येत होता. साधारण कळकट कपडे, गळ्याभोवती रंगीबेरंगी रुमाल, तोंडात पानाचा तोबरा, डोकीवर दिलीप-राज टाईप झुलपं नि तोंडात कुठलीतरी गाणी किंवा अर्वाच्च बडबड—ह्या पॉलिशवाल्याच्या नेहमीच्या

वर्णनाशी ह्या मुलाचं सारंच विसंगत होतं. साधेच, ठिगळं लावलेले पण स्वच्छ कपडे, चेहऱ्यावरचे निरागस भाव, किंचित तांबूस, गोरा वर्ण, सरळ, टोकाला किंचित पसरट झालेलं नाक, पाणीदार, घारे डोळे– छे. छे ! हा तर कोणीतरी चांगल्या घरातला ९ वी १० वीतला मुलगा वाटत होता ! पण मग पॉलिशवाल्यांच्या रांगेत, पॉलिशच्या डब्या घेऊन ? ह्या विसंगतीची संगती लावण्याचा प्रयत्न माझं मन करू लागलं, आणि अगदी न कळतच मी माझा पाय त्या मुलासमोर केला. त्याचा ब्रश माझ्या जोड्यावर फिरू लागला.

आता मी त्याचं निरीक्षण अधिक चांगल्या प्रकारे करू शकत होतो. त्याचे दाट, कुरळे, किंचित भुरे केस कित्येक दिवसांत तेलाच्या स्पर्शाशिवायही आकर्षक भासत होते. केसांच्या उजवीकडची झुलपं अगदी अभावितपणेच कपाळावर रुळत होती. अंगापिंडानं तो मध्यम बांध्याचा वाटत होता. त्याचा हात, ब्रश, बुटावरून सफाईनं फिरत होता, आणि अगदी तन्मयतेनं त्याचं काम चालू होतं. कसल्याही प्रकारची चालढकल, दुसरं गिऱ्हाईक हेरायसाठी घाईगर्दी ह्या नेहमी प्रत्ययास येणाऱ्या पद्धतीच्या पार्श्वभूमीवर त्याचा तो शांतपणा, नि तरीही सफाई न् चपळाई डोळ्यात भरत होती. पण त्याहीपेक्षा लक्षात येत होता, तो त्याच्या डोळ्यात तरळणारा अकाली प्रौढत्वाचा भाव ! त्याचं जसजसं मी निरीक्षण करीत होतो, तसतशी त्याच्याविषयीची उत्सुकता वाढत होती. आता पॉलिश संपत आलं होतं. शेवटलं फडकं जोड्यावर मारलं जात होतं. त्या मुलाचं समोर रस्त्यावर लक्ष गेलं असावं, कारण त्यानं अगदी सहज साद घातली– " काय बेबी, पॉलिश करायचं का ?" मी मागे वळून पाहिलं. एक पाच-सहा वर्षांची मुलगी आपल्या वडिलांजवळ तिच्या बुटांना पॉलिश करून घेण्याविषयी हट्ट धरून बसली होती. वडिलांनी तिचा हट्ट पुरा करायचा विचार केला असावा, कारण ते आता पॉलिशवाल्यांच्या लाईनकडे वळले होते. मी हसत हसतच त्या पॉलिशवाल्याचं खोकं रिकामं केलं, व त्या मुलाच्या हातावर चार आण्याचं नाणं टाकलं. तो दहा पैशांचं नाणं परत करू लागला तेव्हा मी त्याला सहजच म्हटलं, " राहू दे तुला !" पण त्यानं निश्चयात्मक मान हलवत म्हटलं, " नाही साहेब, पॉलिशचा भाव आहे पंधरा पैसे. मी जास्त घेऊ शकत नाही. " आणि त्यानं ते नाणं मला परत केलं. हे सारंच मला अनपेक्षित होतं. वास्तविक ह्याच दहा पैशांत मला माझ्या नेहमीच्या पॉलिशवाल्याकडून झक्क सलाम मिळाला असता. पॉलिशवाल्यांच्या ठिकाणी अस्वाभाविक अशा स्वाभिमानी न् किंचित ताठर वृत्तीचं मला नवल वाटलं. त्याच्या हातून ते नाणं परत घेत मी विचारलं, " नाव काय तुझं ? "

" रमेश ! " त्याचा तुटक स्वर मला जाणवला. त्याची मान व नजर खाली वळली आणि त्याचे हात बेबीच्या बुटांचे रूप पालटू लागले.

रमेशची आणि माझी ओळख झाली ती ही अशी ! त्याची ती मानी, ताठर

वृत्ती, ते तुटक उत्तर ह्यामुळे मला त्याचा राग यायला हवा होता. पण मानवी स्वभावाची गंमतच अशी असते, की ज्याच्याविषयी प्रथमदर्शनीच त्याचं मन चांगलं होतं, त्या व्यक्तीनं त्याच्याशी कशाही तऱ्हेचं वर्तन केलं तरी तो राग मानीत नाही तर त्या व्यक्तीच्या त्या वर्तनाची संगती लावायचा तो प्रयत्न करीत राहतो ! रमेश-बाबत माझं काहीसं तसंच झालं. त्या प्रसंगानंतर मी जेव्हा जेव्हा त्याच्याविषयी विचार केला, तेव्हा तेव्हा माझ्या मनासमोर प्रथम तरळे तो त्याचा निरागस, निष्पाप चेहरा ! त्याच्या पाणीदार घाऱ्या डोळ्यातनं अस्पष्टपणे डोकावणारा अकाली प्रौढत्वाचा भाव !! त्याच्याविषयीचं माझं कुतूहल वाढतच गेलं. त्या कुतूहलापायीच मी रोज त्याच्याकडे धाव घेऊ लागलो. जोड्यांना पॉलिशची आवश्यकता असो वा नसो, मी नियमितपणे त्याच्याकडून पॉलिश करून घेऊ लागलो. अधूनमधून उगीचच 'क्रीम' लावायला सांगू लागलो. कळत होतं, हे असे पैसे उधळणं मूर्खपणाचं आहे, पण त्याच्याविषयीची जिज्ञासा गप्प बसू देत नव्हती. मी नेहमीचं गिऱ्हाईक झाल्याचं त्यानं ओळखलं होतं, पण फारशी आस्था रमेशनं माझ्याविषयी कधीच दाखवली नाही. त्याची कामातली तन्मयता कधीच ढळली नाही; आणि नेहमीचं गिऱ्हाईक म्हणून त्याच्या वाचाळतेला पाऱ्हाही कधी फुटला नाही. नियमितपणामुळे निर्माण झालेल्या अस्पष्ट आपुलकीनं की कशानं कोण जाणे, पण त्याचा सुरुवातीचा तुटकपणा मात्र संपला होता. मला माझ्या प्रश्नाविषयीची उत्तरं मिळत होती. तो बोलू लागला होता हे कारण असेल, पण त्याच्याविषयीचं कुतूहल वाढत होतं, जिज्ञासा बळावत होती. त्या जिज्ञासेमुळे मी त्याच्या जीवनात अधिकाधिक खोल डोकावू लागलो, त्याच्याविषयी अधिकाधिक माहिती मिळवायचा प्रयत्न करू लागलो !

रमेशच्या अकाली प्रौढत्वाचे कारण त्याच्यावर कोसळलेल्या अकाली संकटांत होतं. दैवही कोलांटी उडी फारच क्वचित मारतं. साधारणतः सुसंपन्न माणसांचं संपन्नत्व वाढतच जातं आणि गरीब दारिद्र्याकडे झुकू लागतं हेच नेहमीचं चित्र आहे. दैवानं रमेशच्या बाबतीत अपवाद केला नव्हता. त्या दुःखी, कष्टाळू जीवावर नवी नवी संकटं लादण्यांत दैवाला जणू आसुरी आनंद होत असावा. रमेशचं घर सर्वसामान्य पांढरपेशा गरीब समाजातल. कुटुंबप्रमुख हे ह्या घराचं एकमेव आश्रयस्थान ! त्याच्या तुटपुंज्या मिळकतीत घरच्या पाच–सातजणांची पोटं भरून महिन्याची सुरुवात–शेवटाची तोंडमिळवणी करणं म्हणजे केवळ तारेवरची कसरत आणि ह्याच व्यक्तीवर जेव्हा काळाची उडी पडते, तेव्हा अर्धशिक्षित, कामाची सवय नसणाऱ्या त्या पांढरपेशा–मध्यमवर्गीय माऊलीची जी स्थिती होते ती रमेशच्या आईची होती. फक्त दुर्दैव त्या बाबतीत अधिक कठोर बनलं होतं एवढंच–रमेशपाठोपाठच्या तीन अयशस्वी बाळंतपणांमुळे ती बाई कायमची अंथरुणाला खिळली होती ! त्यातच पतीच्या मृत्यूचा धक्का ती पचवू शकली नव्हती. ती आणि

तिच्या पोटचा एकुलता एक गोळा रमेश उघड्यावर फेकले गेले होते, पोरके झाले होते ! आई अंथरुगाला खिळलेली नि रमेश आठवीचा विद्यार्थी, अशी विचित्र जोडी जीवननौकेवर निराधार सोडून नौकेचा सारथी निघून गेला होता. नौका किनाऱ्याला लागण्याऐवजी, वाटेतच तुफानी झंझावातामुळे उलटणार असं वाटूं लागलं, आणि ह्याच वेळी रमेशनं प्रखर जिद्दीनं सुकाणू हाती घेतलं. नाव हेलकावत हेलकावत मार्ग आक्रमू लागली !

रमेशशी झालेल्या संभाषणामधून, माझ्या विचारलेल्या प्रश्नांमधून मिळालेल्या अलग अलग धाग्यांनी हे चित्र माझ्यासमोर उभं केलं होतं. चित्र भयानक होतं. मन हेलावून टाकणारं होतं. पण रमेशची जिद्द पाहिली, चिकाटी पाहिली, की मन हरखून जात होतं, कौतुकानं भरून येत होतं. त्यानं शिक्षणाचा धागा अजूनही तोडला नव्हता. मिळेल ते काम करून, मजुरी करून, बूट-पॉलिश करून तो स्वतःची व आईची गुजराण करीत होता; आणि फावल्या वेळात शाळेचा अभ्यास करीत होता. रमेशची आणि माझी ओळख आता हळूहळू वाढू लागली होती. पूर्वीचा तुटकपणा नाहीसा झाला होता. आपुलकीचा नवा धागा निर्माण झाला होता. रमेश मधनं मधनं घरी येऊ लागला होता. त्याची चिकाटी, त्याचा उमदा स्वभाव आणि त्याची परिस्थिती, ह्यामुळे त्याच्याविषयी जास्त आपुलकी वाटत होती. त्याला मदत म्हणून वस्तू दिली की ती तो घेत नसे. मग कर्जाऊ म्हणून त्याला छोटचा छोटचा रकमा मी देऊ लागलो. माझ्या धाकटचा भावाची पुस्तकं मी त्याला दिली. त्याच्या मागे लागून लागून, एकदा त्याच्या घरी गेलो. चाळीतल्या एका अंधाऱ्या खोलीत दारिद्र्य 'आ' वासून पसरलेलं होतं. आईच्या अंगावरचे दागिने केव्हाच संपुष्टात आले होते. घरातली चीजवस्तुही त्यांना हलके हलके सोडत होती. रमेशच्या आईची स्थितीही फारशी आशादायक नव्हती. कंदिलाच्या अंधुक उजेडात दिसला, तो चेहऱ्यावर सुरकुत्या पडलेला, डोळे खोल गेलेला, कृश, निस्तेज देह ! ते दृश्य पाहून डोकं गरगरलं, भयानकतेच्या वास्तवतेची जाणीव होऊन हृदयाचा थरकाप झाला. सहजगत्या प्रश्न गेला,

"औषध कोणाचं चालू आहे ?"

जरा वेळ कोणीच काही उत्तर दिलं नाही. अंमळशानं आईच उद्गारल्या, "कोपऱ्यावरच्या पेठे डॉक्टरांचं होतं पण बाकी खूप थकली, न् आठवड्यापासून आता कोणाचंच नाही." मी चरकलो. डॉ. पेठ्यांवर चडफडलो; पण जाणवलं, दोष त्यांचा एकटयाचा नाही; साऱ्या समाजाचा आहे. परिस्थिती चिघळत जाते. एखादा संसार उधवस्त होऊ लागतो. तेव्हा समाज स्वस्थ असतो, चित्रपटाप्रमाणे संसाराचा उधळता डाव पाहात असतो, आणि तो पूर्ण उधळला गेला की मग समाज नुसताच हळहळतो. ही समाजाची रीत आहे. डॉ. पेठे तरी त्याला अपवाद का असावेत ? मी उठलो. डॉ. पेठ्यांकडे गेलो. त्याचं बिल मागवलं आणि त्यांना

घेऊन रमेशच्या खोलीवर आलो. डॉक्टरांनी आईंना तपासलं, बाजूला घेऊन मला सांगितलं, " काहीच होप्स नाहीत ह्या केसमध्ये. मि. राजे हे लक्षात आलं होतं, म्हणूनच मी ट्रीटमेंट बंद केली होती. "

" हरकत नाही, डॉक्टर तरीही ट्रीटमेंट चालू ठेवा. बिलाची काळजी करू नका."

मी आत वळलो. रमेशच्या आईजवळ पंधरा–वीस रुपये ठेवले. रमेश आणि आईच्या डोळ्यांतून धारा वाहात होत्या. मी रमेशच्या पाठीवरून हात फिरवला आणि बाहेर पडलो, तेव्हा मलाही स्वत:ला मन आवरणं जड गेलं !

ह्यानंतर मी रमेशच्या आईला पाहायला वारंवार रमेशकडे जाऊ लागलो. रमेश स्वीकारीत नसलेली मदत मी त्याच्या आईकडे देऊ लागलो. ते समजलं की, रमेश चिडे, संतापे. त्या वेळी त्याच्या पाठीवरून हात फिरवीत मी म्हणे, " रमेश, तू मोठा झालास, मिळवू लागलास, की साऱ्याची भरपाई मी तुझ्याकडून घेणार आहे. " त्या वेळी रमेशच्या डोळ्यांतून धारा वाहात जड स्वरांत शब्द येत–" तुमचे उपकार मी जन्मात विसरणार नाही, साहेब ! "

अशाच एका रविवारी दिवेलावणीच्या सुमारास मी रमेशच्या घरी गेलो. कोपऱ्यातल्या देव्हाऱ्यापाशी रमेशची आई निरांजन हातात घेऊन तोंडानं काही तरी अस्पष्ट स्वरांत म्हणत होती. तिच्याच मागे दोन्ही हात जोडून, डोळे मिटून रमेश गंभीरपणे उभा होता. निरांजनाच्या मंद प्रकाशात दोघांच्या चर्येवर एक आगळंच सात्त्विक तेज विलसत असलेलं दिसलं. एक प्रकारचं गंभीर, पवित्र वातावरण तिथे निर्माण झालं होतं. परमेश्वराच्या सान्निध्यात जणू त्यांना त्यांच्या परिस्थितीचा, दु:खाचा विसर पडला होता. माझे हातही अगदी नकळतच जोडले गेले. थोड्या वेळानं घंटेचे मंजुळ स्वर निनादले, आरती झाली. आईंनी प्रसादाचा गुळाचा खडा हातावर ठेवला. अठराविश्वे दारिद्र्यातही, संकटांशी झुंज घेत एक महान संस्कृती तिथं मानानं उभी होती ! !

त्यानंतर अचानकपणे एके दिवशी माझ्या हाती एक ऑर्डर आली. कंपनीने दोन वर्षांसाठी डेप्युटेशनवर मला कलकत्त्याला पाठवायचं ठरवलं होतं. मान मोठा मिळणार होता, आर्थिक परिस्थितीत फरक पडणार होता. पुढचं भवितव्य उज्ज्वल होतं. अर्थात मला, माझ्या घरच्यांना, सर्वांनाच आनंद झाला. कलकत्त्याला जायच्या आदल्या दिवशी मी रमेशकडे गेलो. तो निरोप–प्रसंग फारच कठीण वाटला. एक जिव्हाळा, एक आपुलकी निर्माण झाली होती. वास्तविक रमेश कोण, कुठला ? पण त्याच्या स्वभावानं घातलेली भुरळ जबरदस्त होती. रक्तासारखं नातं निर्माण करायला लावणारी होती. भावनिक जवळिकेतून निर्माण झालेले बंध क्वचित रक्ताच्या नात्यापेक्षादेखील अधिक दृढ ठरतात, आणि म्हणूनच अशा व्यक्तींना अंतरण्याचा प्रसंग येतो, तेव्हा मन आक्रंदून उठतं ! व्यावहारिक बुजगावण्याच्या साऱ्या सीमा, भावना उल्लंघून टाकतात ! ! हा निरोप असाच भावना बोलक्या

करणारा ठरला. जवळ जवळ तास–दोन तासांहूनही अधिकच, त्या दिवशी मी रमेशच्या आईजवळ बसलो. एक अनामिक भीती त्या प्रसंगाच्या वेळी मनाला वरचेवर स्पर्शून जात होती. रमेशच्या आईची न् माझी कदाचित ही शेवटचीच भेट ठरणार होती. आईच्या मागे, रमेश ह्या जगात एकटा राहणार होता. त्या वेळी कदाचित त्याला माझ्या सान्निध्याची गरज भासणार होती......हे सारं सारं मनात तरळून जात होतं. भावनांचे बंध आवरत नव्हते.........मोठ्या नाइलाजानं मी त्या मायलेकांचा निरोप घेतला. निघताना रमेशच्या आईजवळ शंभराच्या दोन नोटा ठेवल्या. रमेशला आईची काळजी घ्यायला सांगितलं, न् बाहेर पडलो.

स्टेशनवर, मला पोचवायला, रमेश आला होता. त्यानं माझ्या बुटांना पॉलिश केलं, पैसे न घेता ! त्याची ती अल्पशी भेट मला फार मौल्यवान वाटली. शेकडो फुलांच्या ताटव्यांत बसलेलं हे फूल मला सर्वाधिक सुवासिक वाटलं; ते माझ्या मनाला जास्त सुखवीत होतं ! गाडीनं फलाट सोडला, मन भारावून आलं होतं. एक अनामिक काळजी मनाला हुरहूर लावीत होती !

जवळ जवळ दोन वर्षांनंतर मी मुंबईला परतलो. मध्यंतरी, कलकत्त्याला गेल्यानंतरच्या पहिल्या महिन्या–दोन महिन्यांत रमेशची पत्रं येत होती. पण पुढे ती बंद झाली. आणि मीही कामांच्या व्यापात दंग होतो. मुंबईला परतल्यावर मात्र रमेशविषयीची उत्सुकता मला स्वस्थ बसू देईना. घरात कुणालाच काही कल्पना नव्हती. मी मुंबई सोडल्यानंतर तो आमच्या घराकडे फिरकलाच नव्हता. नाक्यावरही तो आता आताशा बसत नव्हता असं धाकट्या भावानं सांगितलं. माझी उत्सुकता आता मात्र जास्त चाळवली गेली होती. कशीबशी दोन दिवस कळ काढून, तिसऱ्या दिवशीं मी रमेशच्या खोलीवर गेलो. रमेशच्या खोलीचं स्वरूप बदललं होतं. आपला पलंग, वेगवेगळे फोटो, इतर सामान–सुमान, फर्निचर सांगत होतं, की आता ह्या खोलीत रमेश आणि त्याच्या आईचं वास्तव्य नाही. तरीही मी उघड्या दारावरची कडी वाजवली. एक मध्यमवयीन नीटस बाई सामोरी आली. "कोण रमेश ? इथे नाही. आजूबाजूला चौकशी करा." माझ्या प्रश्नाला उत्तर देऊन ती बाई आत वळली. दोन मिनिटं तसाच खोलीसमोर उभा राहिलो. जुने अनेक प्रसंग डोळ्यांसमोरून तरळून गेले. मी आजूबाजूला चौकशी केली. एकदोन ठिकाणी चौकशी करून जी माहिती मिळाली ती ऐकली आणि सुन्न झालो. मस्तक बधिर होतंय्सं वाटलं. स्वतःचा, भोवतालच्या साऱ्या समाजाचा, रमेशच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांचा राग आला. आमच्यापैकी कोणी, कोणी रमेशला वाचवू शकलं नव्हतं ! किंबहुना त्याच्या–माझ्या ह्या सर्व समाजानं त्याच्या गरिबीची क्रूर चेष्टा केली; त्याला सहानुभूती देऊन सांभाळून घेण्याऐवजी, त्याच्यावर परिस्थितीनं मात केली असता, सारा समाज हृदयशून्यतेनं तो तमाशा पाहात राहिला. रमेशविषयी कळली होती ती माहिती अशी होती–

चवथी सचित्र आवृत्ती

□□

# राजा शिवछत्रपति

□□

ब. मो. पुरंदरे

□□

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

□□

राजहंस प्रकाशन

पुणे

"माझ्या कलकत्त्याला झालेल्या प्रयाणानंतर दोनच महिन्यांनी रमेशच्या आईचा मृत्यू झाला होता, आणि... आणि... रमेशनं ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला होता !!! "

मी जास्त माहिती गोळा करायचा प्रयत्न केला तेव्हा कळलं, रमेशच्या आईच्या मृत्यूच्या आदल्या दिवशी डॉ. पेठ्यांनी पुन्हा एकदा, बिल तुंबल्यामुळे रमेशला धुडकावून लावलं होतं. रमेशच्या आईच्या मृत्यूनंतर तिच्या उत्तरक्रिया पार पाडायलाही रमेशजवळ पुरेसे पैसे नव्हते. शेवटी कुणीतरी फोन केला, नगरपालिकेची शववाहिनी आली आणि रमेशच्या आईच्या प्रेताची विल्हेवाट लावण्यात आली. त्यानंतर एकदोन दिवस रमेशला सहानुभूतीचे तुटक शब्द ऐकायला मिळाले. कुठे कुणाचा सांत्वनाचा दिलासाही मिळाला. पण मायेचा खरा आधार मात्र कुणीच देऊ शकलं नाही.

आईच्या मृत्यूनंतरचा पंधरावा दिवस उजाडला, तो रमेशच्या दृष्टीनं काळाकुट्ट अंधार घेऊनच ! चाळीच्या मालकानं सकाळीच येऊन, रमेशचं बकोटं धरून त्याला बाहेर काढले, ह्या समाजाशी असलेल्या त्यांच्या उरल्यासुरल्या संबंधांना सुरुंग लावला. शेजारी-पाजारी, तो समाज, ह्याविषयी एक प्रकारचा तिरस्कार घेऊन रमेश निघाला तो नाक्यावरच्या अड्ड्यावर आला. तिथला त्याचा समव्यवसायी मित्र बेंजामिन शेवटी त्याच्या मदतीला आला. बेंजामिनबरोबर चर्चच्या आऊटहाऊसमध्ये राह्यचं, बूट-पॉलिश करून चरितार्थ भागवायचा आणि फावल्या वेळात पुस्तकं चाळायची हा मग रमेशचा दिनक्रम बनला. त्याच वास्तव्यांत चर्चच्या फादरच्या नजरेत रमेश भरला. तो तांबूस गौर वर्ण, ते घारे डोळे, ते प्रौढत्व, ती वागणूक – ह्या साऱ्यांनी फादरवर भुरळ घातली. त्यांनी त्याच्या पालनपोषणाची जबाबदारी स्वीकारली. त्याचं शिक्षण मॅट्रिकच्या दिशेनं गती घेऊ लागलं. पण त्यापूर्वीच मधल्या काळात त्याचं धर्मांतर पूर्ण झालं होतं. सहा हजार मैल लांबून आलेल्या एका धर्मोपदेशकाला त्याचे उपजत गुण ओळखता आले होते. लहानपणापासून ज्या समाजात रमेश वावरला, त्या समाजानं मात्र त्याला ठोकरलं होतं. त्या धर्मोपदेशकानं या छोट्या शक्तीला आमच्यापासून दूर नेऊन, रमेशला त्याच्या समाजानं नाकारलेले हक्क प्राप्त करून देऊन आपल्यात सामावून घेतलं होतं. ती शक्ती आता आस्ते आस्ते प्रभावशाली होऊन राबणार होती – ह्या समाजाच्या मुळावर घाव घालायला ! इथल्या संस्कृतीचे लचके तोडायला !! आमचा समाज हे सारं बघत राहणार होता – निष्क्रियतेनं, स्वाभिमानशून्यतेनं !!!

त्यानंतर रमेश मला जवळ जवळ तीन-चार वर्षं भेटलाच नाही. नंतर एकदा मी त्याला पोर्तुगीज चर्चच्या नाक्यावर पाहिलं. त्यालाही आज चार वर्षं होऊन गेली. तीच माझी रमेशची शेवटची भेट. त्यानंतर आतापावतो त्याचा माझा संबंध नाही. त्या दिवशी त्यानंच मला हाक मारली. एकंदर गप्पांतून कळलं, मॅट्रिकनंतर

त्यानं ख्रिस्ती धर्मप्रसाराला वाहून घ्यायचं ठरवलं होतं, आणि तशी त्याची तयारी चालूही होती. तो म्हणत होता, " साहेब, आई गेली, आणि सुरुवातीला माझे फार हाल झाले. आजूबाजूच्या जगात सहानुभूती, दया, माया जणू लोप पावली होती. माझं नशीब, मला फादरचा आश्रय मिळाला. फादर स्टिव्हन्स, फार चांगले आहेत. एकदा ओळख करून देईन मी तुमची–त्यांची. आईनंतर, कुणी मायेची पाखर माझ्यावर घातली असेल, तर ती त्यांनीच. फादर होते म्हणून मी आज आहे. भगवान येशूची कृपा......"


रमेश आणखीही बरंच बोलत राहिला. पण, माझं लक्ष नव्हतं त्याकडे. माझ्यासमोर उभा होता, ख्रिस्ती धर्मोपदेशक रमेश. पायघोळ पांढरा झगा, पायात जोडे, हातात बायबल न् गळ्यात क्रॉस ! न कळत माझ्या मनश्चक्षूंसमोर उभा राहिला. निरंजनाच्या मंद ज्योतीत दिव्य सात्त्विक तेजाने तळपत्या चेहऱ्याचा, परमेश्वरापुढे हात जोडून उभा असलेला, मला वेड लावून गेलेला रमेश ! तोच माझा खराखुरा रमेश. हा फादर रमेश दुसराच कुणी असेल असं वाटलं एकदा ! पण सत्य निष्ठुर होतं. अन् सत्य जाणवलं तेव्हा मन आक्रोशलं ! वाटलं असे शेकडो रमेश आज देशभर असतील. आमचा समाज त्यांना ठोकरत असेल. ते वणवण भटकून अन्य ठिकाणी माया, आसरा, आधार शोधीत असतील: कदाचित तो त्यांना मिळून त्यांच्या जुन्या निष्ठा बदलल्या जात असतील, त्यांच्या जुन्या श्रद्धांचा विचका होत असेल. हेच शेकडो रमेश मग, नव्या त्वेषानं फूत्कार सोडून आमच्या समाजाची शक्ती खच्ची करीत असतील. आमचा समाज मात्र तरीही थंड गोळाच राहात असेल. भाकड गाई मारल्या जातात म्हणून जो समाज प्रखर आंदोलनं उभी करतो, तोच समाज, आमची शक्ती वाढवू शकतील असे हे आमच्याच रक्तामांसाचे गोळे, आमचीच शक्ती खच्ची करण्याच्या प्रक्रियेत स्वहस्ते हाकलले जात असता मात्र स्वस्थ बसतो ! थंड राहतो !!

○

स्वादिष्ट मिठाईसाठी आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २




कम्युनिस्ट क्रांतीची निर्यात करण्याचे लेनिनने या काळात खूप प्रयत्न करून पाहिले होते.

पोलंड आणि लॅटव्हिया या दोन देशांमध्ये कम्युनिस्ट राजवट प्रस्थापित करण्यासाठी गेलेले लाल सैन्य सीमेवरच अडविण्यात आले. जर्मनीमध्ये कम्युनिस्टांनी तीनदा उठाव केले. पण ते अयशस्वी ठरले. हंगेरीमध्ये बेला कुन याची राजवट काही महिनेच टिकली. बेला कुनच्या हुकूमशाहीला बहुसंख्य नागरिकांचा विरोध होता असे बुखारिन याने म्हटले आहे. जर्मनीप्रमाणे हंगेरी आणि चेकोस्लोव्हाकिया येथील उठावही तावडतोब मोडून काढण्यात आले. क्रांतीची निर्यात करण्याचे हे सारे प्रयत्न फसल्यानंतरही जागतिक क्रांतीवरचा लेनिनचा विश्वास अढळ होता.

१९२० मध्ये युक्रेनमधून पोलिश सेनेला हाकलून लावण्यात येताच लेनिनने लाल सैन्याला पोलंडवर चालून जाण्याचा आदेश दिला. पश्चिम युरोपातील कम्युनिस्ट क्रांतीचा पायारोवा करण्यासाठी त्याने पोलंडवरील हल्ल्याचा बेत निश्चित केला होता. ट्रॉटस्की लिहितो– 'पोलंडमधील जमीनदारांचा व मध्यमवर्गाचा बंदुकीच्या साहाय्याने निःपात करा असा लेनिनचा हुकूम होता. वॉर्सावर चालून जाण्याचा हा प्रयत्न यशस्वी होणार नाही हे आम्हा सर्वांना अगोदरच ठाऊक होते. परंतु आमचे ऐकायचे नाही असा जणू लेनिनचा निर्धारच होता. लेनिनची ही चूक सोव्हिएट सरकारला बरीच महाग पडली. कारण रिगा येथे पोलंडशी करार केल्यामुळे आमचा जर्मनीबरोबरचा संबंध तुटला; इतकेच नव्हे तर आपल्या देशात

## क्रांतिकारक केवळ हुकुमशाहीच निर्माण करतात, आणि लेनिनच्या आजीव क्रांतिकारकांनीच रशियातील लोकशाही समाजवादाचा खून पाडला.

*मार्तोव्ह*

कम्युनिस्ट क्रांती घडून येता कामा नये हा पश्चिम युरोपातील नागरिकांचा निश्चय अधिकच दृढ झाला. आम्ही जर पोलंडमध्ये लष्करी हस्तक्षेप केला नसता तर तेथे काही महिन्यांच्या आत कम्युनिस्ट क्रांती घडून आली असती याबद्दल मला मुळीच शंका नाही.' वॉर्सावर हल्ला करून आपली चूक झाली अशी नंतर लेनिननेही कबुली दिली.

रशियात यादवी युद्ध भडकले असताना आणि लगतच्या देशांत क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न फसलेला असतानाही कॉमिन्टर्न अधिक शक्तिशाली कशी होईल याकडे लेनिनचे लक्ष होते. कॉमिन्टर्नची पश्चिम युरोपीय शाखा स्थापन करण्याची जबाबदारी रटगर्स या डच कम्युनिस्टाकडे सोपविण्यात आली. १४ ऑक्टोबर १९१९ रोजी रटगर्स लेनिनच्या भेटीसाठी मॉस्कोला आला होता. या वेळी डेनिकिनने ओदेसावर हल्ला चढविला होता. त्यामुळे लेनिन रटगर्स याला म्हणाला, "हॉलंडला परत जाताना जर 'तुला' हे शहर पडल्याची बातमी तुझ्या कानावर आली तर उरलपर्यंत माघार घेण्यावाचून आम्हांला गत्यंतर नाही, हे तू आपल्या पश्चिम युरोपातील कार्यकर्त्यांना समजावून सांग."

कॉमिन्टर्नची दुसरी परिषद १९२० च्या जूनमध्ये पेट्रोग्राड येथे भरली होती. प्रारंभीचे कामकाज आटोपल्यानंतर ही परिषद मॉस्कोला आणण्यात आली आणि तेथे तिचे ऑगस्टपर्यंत कामकाज चालू होते. या परिषदेला सदतीस देशांचे प्रतिनिधी हजर होते. जगभर कम्युनिस्ट

९

तत्त्वज्ञानाचा प्रचार करण्यासाठी कोणता कार्यक्रम अवलंबायचा यासंबंधी या परि षदेत लेनिनने बरेच विस्ताराने विवेचन केले होते. क्रांती घडवून आणण्यासाठं प्रत्येक देशातील कम्युनिस्ट पक्ष बलवान झाला पाहिजे, असा लेनिनचा आग्र होता. देशात ठिकठिकाणी आपले गुप्त अड्डे निर्माण करण्याचे प्रयत्न होत अस ताना एक सनदशीर पक्ष म्हणूनही कम्युनिस्टांनी वावरले पाहिजे यावर त्याने भ दिला होता. लोकशाहीवर लेनिनचा किंचितही विश्वास नव्हता. कॉमिन्टर्नच्य दुसऱ्या परिषदेत बोलताना तो म्हणाला होता, ' कोणत्याही **संसदेमार्फत आप ल्याला हव्या असलेल्या सुधारणा घडून येतील अशा भ्रमात राहू नका. संसदेसारखं लोकशाही यंत्रणा आपल्याला हवी त्या वेळी नष्ट करता यावी यासाठीच आप संसदेचा ताबा मिळविण्याचा प्रयत्न करायचा आहे.'**

कम्युनिस्ट तत्त्वज्ञानात लोकशाहीला स्थान नसते याचाच हा पुरावा आहे.

हे तत्त्वज्ञान ज्यांना बिनशर्त मान्य आहे अशांनाच कॉमिन्टर्नचे सदस्यत्व देण्याचं लेनिन दक्षता घेत होता. कोणत्याही मार्गाचा विधिनिषेध नसलेले कार्यकर्ं आंतरराष्ट्रीय साम्यवादाचे अग्रदूत ठरतील हे तो वारंवार सांगत होता.

युरोपमधील भांडवलशाही राष्ट्रांविरुद्ध जनमत तयार करण्यासाठी त्या राष्ट्रांच्य साम्राज्यवादावर हल्ला-चढविला पाहिजे. कारण त्या योगे या राष्ट्रांच्या ताब्यात असलेल्या वसाहतींमधील जनतेची आपल्याला सहानुभूती लाभेल हे ओळ· खून 'भांडवलशाही राष्ट्रेच साम्राज्यवादी असतात' हे लेनिनने कम्युनिस्ट चळ· वळीचे घोषवाक्य केले होते. 'कॉमिन्टर्न'च्या परिषदेत बोलताना तो म्हणाला, ' आपल्या वसाहतींचे शोषण करूनच युरोपमधील भांडवलशाही देश धनाढ्य बनले आहेत. वसाहतींचे शोषण हाच आधुनिक भांडवलशाहीचा मुख्य आधार आहे. म्हणून या देशांची साम्राज्ये नष्ट केल्याशिवाय या भांडवलशाही राष्ट्रांचे सामर्थ्य खच्ची करता येणार नाही.'

या परिषदेत कॉमिन्टर्नने आपला एकवीस कलमी कार्यक्रम मंजूर केला. या मसुद्यावर जरी अध्यक्ष म्हणून झिनोव्हेव्हची स्वाक्षरी असली तरी तो लेनिननेच तयार केला होता. लेनिनच्या मृत्यूनंतर त्याच्या लेखसंग्रहात हा प्रसिद्ध मसुदा अंत-र्भूत करण्यात आलेला आहे.

या एकवीस कलमी कार्यक्रमातील महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत—

१. ज्या राजकीय पक्षांना कॉमिन्टर्नमध्ये दाखल व्हावयाची इच्छा आहे, त्यांनी इतर समाजवादी पक्षांबरोबरचे आपले सर्व संबंध ताबडतोब सोडून दिले पाहिजेत.

२. त्याचप्रमाणे आपल्या देशातील कामगार चळवळीमध्ये इतर समाजवादी पक्षांच्या प्रतिनिधींची हकालपट्टी करून त्यांच्या जागी कम्युनिस्ट सदस्यांनी काम-गार संघटनांचा ताबा घ्यावयास हवा.

३. प्रत्येक कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती व इतर प्रमुख समित्यांमध्ये आपण कॉमिन्टर्नमध्ये समाविष्ट झाले पाहिजे असा आग्रह धरणाऱ्या सदस्यांचे निर्विवाद बहुमत असले पाहिजे.

४. कॉमिन्टर्नमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व पक्षांनी आपला आतापर्यंतचा 'सोशल डेमोक्रॅटिक' कार्यक्रम झुगारून देऊन कम्युनिस्ट कार्यक्रम स्वीकारला पाहिजे. फक्त या कार्यक्रमात स्थानिक परिस्थितीनुसार लहानसहान फेरबदल करण्याचाच काय तो अधिकार मान्य केला जाईल. हे बदल करण्यापूर्वी कॉमिन्टर्नच्या कार्यकरिणीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

५. कम्युनिस्ट इंटरनॅशनलमध्ये दाखल होऊ इच्छिणाऱ्या पक्षांनी आपली पूर्वीची नावे टाकून देऊन स्वतःला कम्युनिस्ट म्हणवून घेतले पाहिजे. इतर समाजवादी पक्षांपासून आपण वेगळे आहोत हे नावापासून कार्यक्रमापर्यंत सिद्ध व्हावयास हवे.

६. सर्व कम्युनिस्ट पक्षांची रचना 'केंद्रीय समिती सर्वसत्ताधारी' या तत्त्वावर व्हावयास हवी. त्याचप्रमाणे कम्युनिस्ट पक्षांनी पोलादी शिस्त पाळली पाहिजे. सर्व कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी केंद्रीय समितीचे निर्णय विनतक्रार पाळावयास हवेत. या केंद्रीय समित्यांवर फक्त कॉमिन्टर्नचे नियंत्रण राहील.

७. भांडवलशाही राष्ट्रांनी निर्माण केलेल्या शासनसंस्थेवर कम्युनिस्टांचा विश्वास असता कामा नये. भांडवलशाही राजवट उलथून पाडण्यासाठी कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी एकीकडे उघड पक्ष म्हणून वावरत असताना आपल्या भूमिगत संघटना उभारून क्रांतीची पूर्वसिद्धता करण्याच्या कार्यावर लक्ष केंद्रित करावे.

८. कम्युनिस्ट इंटरनॅशनलमध्ये दाखल झालेल्या सर्व कम्युनिस्ट पक्षांवर कॉमिन्टर्नच्या कार्यकारिणीचे निर्णय बंधनकारक आहेत. जे पक्ष वा सदस्य कॉमिन्टर्नचे नर्णय मानणार नाहीत त्यांना ताबडतोब बडतर्फ करण्यात येईल.

९. प्रत्येक कम्युनिस्ट पक्षाने इतर समाजवादी पक्षांच्या कामगार संघटनांविरुद्ध सतत प्रचार केला पाहिजे. त्याचप्रमाणे समाजवादी राष्ट्रवाद, समाजवादी शांततावाद, राष्ट्रसंघाचे नेतृत्व, निःशस्त्रीकरण इत्यादी कल्पनांवरही जोराने आघात करावयास हवेत.

१०. प्रत्येक कामगार चळवळीत कम्युनिस्ट पक्षाचे स्वतंत्र गट स्थापन करण्यावर भर दिला जावा.

११. सैन्यामध्ये क्रांतीचा प्रचार करणे हे प्रत्येक कम्युनिस्ट पक्षाचे महत्त्वाचे कार्य आहे. जेथे सैन्यात प्रचार करायला बंदी आहे तेथे हे कार्य गुप्त रीतीने केले जावे.

१२. कम्युनिस्ट पक्षाच्या वृत्तपत्रांवर केंद्रीय समितीचे एकतंत्री नियंत्रण असले

पाहिजे. केंद्रीय समितीचे व कॉमिन्टर्नचे निर्णय या वृत्तपत्रात ठळक रीतीने प्रसिद्ध होतील याची अगोदरच व्यवस्था व्हावयास हवी.

कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या यानंतर ज्या परिषदा भरून गेल्या त्यांत वर निर्देशिलेल्या कार्यक्रमाचा आवर्जून पुनरुच्चार करण्यात येत होता. कामगार आणि सैनिक हा आपल्या क्रांतीचा कच्चा माल आहे हे कॉमिन्टर्न आपल्या सदस्य-पक्षांना वारंवार समजावून देत होते. जगातील सर्व कम्युनिस्ट पक्षांवर कॉमिन्टर्नच्या कार्यकारिणीचे नियंत्रण असले पाहिजे या दृष्टीने लेनिनने या कम्युनिस्ट पक्षांचे विचार व आचारस्वातंत्र्य हिरावून घेतले होते. कॉमिन्टर्न सांगेल तेच ऐकायचे ही एकच गोष्ट कॉमिन्टर्नच्या प्रत्येक परिषदेमध्ये उपस्थित प्रतिनिधींच्या मनावर बिंबविण्याचा तो आटोकाट प्रयत्न करीत होता.

कम्युनिस्ट इंटरनॅशनलशी आपण संलग्न व्हावे की नाही याचा निर्णय करण्यासाठी जर्मन इंडिपेंडंट समाजवादी पक्षाची १५ ऑक्टोबर १९२० रोजी हाल येथे बैठक भरली होती. या परिषदेला हजर राहण्यासाठी मार्तोव्ह मुद्दाम मॉस्कोहून हाल येथे गेला होता. मार्तोव्हला पाहून कॉमिन्टर्नचा अध्यक्ष झिनोव्हेव्ह आणि रशियन कम्युनिस्ट पक्षाचा प्रतिनिधी लेझोवस्की यांना खूप आश्चर्य वाटले. मार्तोव्ह येथे कशासाठी आला असावा याचा त्यांना प्रारंभी बोध झाला नाही. या बैठकीच्या काही दिवस अगोदर पोलंड जिंकण्यासाठी वॉर्साच्या रोखाने निघालेल्या लाल सैन्याचा पराभव झाला होता. जर्मनीच्या सीमेपर्यंत सोव्हिएट राजवट भिडविण्याचा लेनिनचा प्रयत्न फसला होता. मार्तोव्हने आपल्या भाषणात या घटनेचा उल्लेख केला. तो म्हणाला, 'पोलंडला दिलेले आश्वासन सोव्हिएट राजवटीने पाळलेले नाही हे वॉर्सावर हल्ला करून लेनिनने सिद्ध केलेले आहे. पोलंडवर आपलं नियंत्रण प्रस्थापित व्हावं या एकाच हेतूने हे आक्रमण करण्यात आलेलं होतं. पोलंडविरुद्ध जर्मनीला युद्धाला प्रवृत्त करणं हे आपलं उद्दिष्ट नव्हतं असं आताच झिनोव्हेव्हनं सांगितलं. पण ते धादांत खोटं आहे. पोलंड आणि इंग्लंड यांच्या युतीविरुद्ध आपण ऱ्हाईनच्या काठावर मुकाबला करू, असे लाल सेना पोलंडमध्ये घुसल्या असताना ट्रॉटस्कीनं जाहीर केलं होतं. पश्चिम रशिया जर्मनीला मिळावा यासाठी रशिया प्रयत्न करील असं लाल सैन्याच्या प्रमुखांनी जर्मन राष्ट्रवाद्यांना आश्वासन दिलं होतं. सारा पोलंड जरी आपल्या ताब्यात आला तरी पोलंडच्या ताब्यात गेलेल्या पश्चिम प्रशियात सोव्हिएट सत्ता प्रस्थापित केली जाणार नाही असं जर्मनीला सांगण्यात आलं होतं. व्हर्सायच्या करारानं निर्माण केलेली शांतता उधळून टाकण्यासाठी जर्मन कम्युनिस्ट पक्ष जर्मन सरकारशी संगनमत करीत होता. हे सारं लेनिनच्या आशीर्वादानंच घडत होतं. डेनिकीनच्या पराभवानंतर रशियातील हत्याकांडं थांबली आहेत असं सांगण्याचं झिनोव्हेव्ह यानं धाडस करावं याचं मला

आश्चर्य वाटतं. कारण तसं काहीही घडलेलं नाही. एका जुलै महिन्यात आठशे जणांना फासावर लटकविण्यात आलेलं आहे. आपली दहशत निर्माण करण्यासाठी बोल्शेव्हिक राजवट केवळ खून करूनच स्वस्थ बसत नाही. सामुदायिक धरपकड, भाषण आणि मुद्रणस्वातंत्र्याची गळचेपी, खटले न भरताच श्रम–छावण्यात रवानगी, निवडणुका लढवायला इतर पक्षांना बंदी असले अनेक मार्ग वापरून लोकांच्या मनात भीतीचं वातावरण निर्माण करायला बोल्शेव्हिकांना संकोच वाटत नाही. इतकंच नव्हे तर जे कम्युनिस्ट कार्यकर्ते आपल्या नेत्यांच्या वर्तनाबद्दल नापसंती व्यक्त करतात त्यांना लागलीच सैबेरियात हद्दपार करण्यात येते. या सर्व प्रकारांना कॉमिन्टर्नची मंजुरी असून समाजवादी सरकार असेच असते असे प्रत्यक्ष कम्युनिस्ट पक्ष मानू लागला आहे.'

मार्तोव्हचा हा धारदार हल्ला पाहून झिनोव्हेव्ह संतापला. परंतु त्याने मार्तोव्हला उत्तर देण्याचा प्रयत्न केला नाही. मार्तोव्हनंतर रुडॉल्फ हिल्फर्डिंग याचे भाषण झाले. तो म्हणाला, 'बोल्शेव्हिकांनी रशियात केवढा भयानक दहशतवाद निर्माण केलेला आहे, हे मार्तोव्हच्या भाषणावरून स्पष्ट झालेले आहे. बोल्शेव्हिझम म्हणजे संधिसाधू प्रवृत्तीचा साम्राज्यवाद असून तो मार्क्सवादाच्या मूलभूत तत्त्वांशी सर्वस्वी विसंगत आहे. समाजवाद आणि साम्यवाद यांच्यांत केवळ वैचारिक मतभेद आहेत असं नव्हे तर दोघांच्या नीतीतच फरक आहे. बोल्शेव्हिकांची अजब नीतिमत्ता सच्चा समाजवाद्याला कधीच मान्य होणार नाही.'

मार्तोव्ह आणि हिल्फर्डिंग यांची सडेतोड भाषणं ऐकल्यानंतर कॉमिन्टर्नच्या कळपात जाण्याचा जर्मन इंडिपेंडंट समाजवादी पक्षाचा पहिला विचार बारगळला.

१९०३ मध्ये लंडन येथे भरलेल्या परिषदेपासून मार्तोव्ह लेनिनच्या हुकुमशाही आणि दहशतवादी विचारसरणीबद्दल विरोध प्रकट करीत होता. लेनिन तेव्हापासून आपला पक्ष हा 'आजीव क्रांतिकारकां'चा पक्ष आहे, असे सांगत होता आणि क्रांतिकारक केवळ हुकुमशाहीच निर्माण करतात असे सांगून मार्तोव्ह त्याला विरोध करीत होता.

**लेनिनच्या 'आजीव क्रांतिकारकां'नी रशियातील लोकशाही समाजवादाचा खून पाडला होता आणि या प्रकाराची साऱ्या जगभर पुनरावृत्ती करण्यासाठी क्रांतीनंतर कॉमिन्टर्नची स्थापना करण्यात आलेली होती.**

लेनिन सांगत होता–'कम्युनिस्टांनी कोणत्याही एकाच मार्गाबाबत आग्रह धरण्याचा वेडेपणा करता कामा नये. जशी परिस्थिती बदलेल तसे आपले मार्गही बदलतील. सशस्त्र उठावापासून विरोधी पक्ष पोखरून काढण्यापर्यंत कोणताही मार्ग आपल्याला खुला आहे. सनदशीर आणि क्रांतिकारी अशा दोन्ही चळवळी आपल्याला

एकाच वेळी चालू ठेवावयास हव्यात. कोणावर हल्ला करण्याला जसं कम्युनिस्टान घाबरता कामा नये तसंच वेळप्रसंगी माघार घ्यायलाही लाज वाटता कामा नये वेळप्रसंगी प्रत्यक्ष आपल्या शत्रूशीही हातमिळवणी करण्यास आपण बिचकता काम नये. शत्रूच्या फाटाफुटीचा फायदा घेण्यासाठी ही हातमिळवणी उपयोगी ठरते थोडक्यात, जशी परिस्थिती असेल त्यानुसार आपल्या लढ्याची दिशा ठरेल.'

या आपल्या सूत्रांनुसार कॉमिन्टर्नचे प्रत्येक देशातील कार्य चालू व्हावयास हवे याबाबत लेनिन वेळोवेळी स्वत: मार्गदर्शन करीत असे.

जॉर्जियाच्या स्वातंत्र्याचे आपण रक्षण करू, असे लेनिनने प्रारंभी आश्वासन दिलेले होते. परंतु त्या आश्वासनाचा भंग करून बोल्शेव्हिकांनी जॉर्जिया आपल्या ताब्यात घेताच ब्रिटिश मजूर पक्षाने या प्रकाराबद्दल लेनिनकडे निषेध व्यक्त केला. या निषेधाची दखल घेताना १९२१ च्या डिसेंबरमध्ये लेनिन लिहितो–'आपण ताबडतोब दुहेरी कार्यक्रम हाती घ्यावयास हवा. एक तर जॉर्जियाच्या प्रश्नाबाबत युरोपीय राष्ट्रांनी जे मत प्रकट केले आहे, त्याची कुचेष्टा करणारे लेख निरनिराळ्या नावाखाली प्रसिद्ध करावयास हवेत. त्याचप्रमाणे ब्रिटिश मजूर पक्षाच्या खलित्याला उत्तर धाडावयास हवे. हे उत्तर अतिशय आर्जवी भाषेत लिहिले गेले पाहिजे. म्हणून हे काम एखाद्या कुशाग्र बुद्धीच्या पत्रकाराकडे सोपवावे. जॉर्जियात आम्ही सार्वमत घेतले पाहिजे, अशी जर सूचना करण्यात आली तर त्या सूचनेचा स्वीकार करण्याची आमची तयारी आहे असे या उत्तरात म्हटले पाहिजे. मात्र सार्वमताचा नियम जगातील सर्व राष्ट्रांना लावला पाहिजे, असा आपला आग्रह आहे हेही या उत्तरात मजूर पक्षाच्या कानावर घालावयास हवे. इतकेच नव्हे तर या बाबतीत मजूर पक्षालाच पुढाकार घेण्यास सांगावे. ब्रिटनने आयर्लंडवरचा ताबा सोडून देऊन तेथे सार्वमत घेतले पाहिजे. या दृष्टीने ब्रिटिश मजूर पक्षाने का प्रयत्न करू नयेत, असे आपण सुचवावे. तीच गोष्ट हिंदुस्थान, कोरिया आदी देशांबाबतही सुचविली जावी. ज्या ज्या देशांमध्ये साम्राज्यवादी देशांची सैन्ये आहेत तेथील जनतेचे सार्वमत घेण्याच्या मागणीचा ब्रिटिश मजूर पक्षाने पुरस्कार करावा, असे या पत्राचे सूत्र असावे. मी पुन्हा सांगतो की, या पत्राची भाषा अतिशय नम्र आणि सुबोध (दहा वर्षे वयाच्या मुलाला समजेल अशी) असावी. म्हणजे मग जॉर्जियाची स्वातंत्र्याची मागणी करणारे ब्रिटिश मजूर पक्षाचे नेते किती महामूर्ख आहेत, हे तरी जगाला कळून येईल.'

लेनिनने १९०७ पासून आपल्या विरोधकांवर तिखट हल्ले चढविण्यास सुरुवात केली होती. १९२१ मध्ये तो हाच प्रयोग आंतरराष्ट्रीय पातळीवर करून पाहत होता. आपल्या विरोधकांना सरळ उत्तर देण्याऐवजी त्यांची कुचेष्टा करण्यात त्याला समाधान वाटत होते.

कॉमिन्टर्नच्या प्रत्येक महत्त्वाच्या निर्णयावर लेनिनचे सतत लक्ष असे. भांडवलशाही राष्ट्रांनी पुन्हा युद्ध सुरू केले तर आपण संपावर जायचे अशा आशयाचे ठराव आंतरराष्ट्रीय धातुकामगार संघाच्या आगामी परिषदेत मांडण्यात येणार आहे, अशी बातमी ३ फेब्रुवारी १९२२ च्या 'प्रावदा'मध्ये प्रसिद्ध झाली. लागलीच लेनिनने बुखारिन आणि झिनोव्हेव्ह यांना पत्र लिहून कॉमिन्टर्नने या मागणीबाबत कोणते धोरण स्वीकारावे याबाबत मार्गदर्शन केले.

लेनिन लिहितो–'पुन्हा युद्ध सुरू झाले तर आपण संपावर जाऊ असा ठराव धातुकामगार आगामी परिषदेत मंजूर करून घेणार आहेत अशी हॅनोव्हर येथून आलेली बातमी कालच्या अंकात प्रसिद्ध झाली आहे. त्या बाबतीत आपण पुढील गोष्टी कराव्यात असे मला वाटते–(१) धातुकामगारांची ही मागणी किती हास्यास्पद आहे हे समजावून देणारे अनेक लेख आपण 'प्रावदा' आणि 'इझवेस्तिया' या पत्रांत प्रसिद्ध करावेत. (२) युद्धाला आवर घालण्यासाठी कोणते उपाय योजता येतील याचा कॉमिन्टर्नच्या आगामी बैठकीत विचार व्हावयास हवा. सर्व सिद्धतेनिशी उभे असलेले क्रांतिकारक पक्षच काय ते युद्धाविरुद्ध उभे राहू शकतील हे कॉमिन्टर्नमार्फत जाहीर होणे आवश्यक आहे. केवळ संप करून युद्ध टाळता येणार नाही. त्यासाठी सैन्यात क्रांति–तत्त्वांचा प्रचार करून क्रांतीसाठी आवश्यक असलेली मनोभूमिका तयार व्हावयास हवी हे कॉमिन्टर्नमार्फत धातुकामगारांना समजावून सांगितले पाहिजे.'

काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

डोंगरे

अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

के. टी. डोंगरे अॅण्ड कं., प्रा. लि.,

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

डोंगरे बालामृताचे

क्रांतिकारकांची नीती वेगळी असते हे सांगायला लेनिनला संकोच वाटत नसे. राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी लोकांची दिशाभूल करणेही या नीतीत बसते अशी त्याची प्रामाणिक समजूत होती. युद्धाविरुद्ध पुकारा करण्याचा केवळ कॉमिन्टर्नलाच अधिकार आहे, कामगारांनी तो अधिकार बजावता कामा नये हे सिद्ध करण्यासाठीच त्याने धातुकामगारांच्या युद्धविरोधी ठरावाची कुचेष्टा करण्याचा आदेश दिला होता.

लेनिन एके ठिकाणी लिहितो–'**ज्याप्रमाणे कोणताही त्याग करण्याची कम्युनिस्टांची तयारी असली पाहिजे त्याचप्रमाणे बेकायदेशीर कृत्य करणे, सत्य दडपून ठेवणे वा टाळणे, फसवणूक करणे हे मार्गही त्याला वर्ज्य नाहीत.** जेणेकरून **कम्युनिस्ट पक्षाचे कार्य वाढेल अशा कोणत्याही मार्गाला आपण बिचकता कामा नये.** अमेरिकन, फ्रेंच आणि ब्रिटिश मजूर नेते व आपले मेन्शेव्हिक यांच्यांत काहीही फरक नाही. म्हणून ज्याप्रमाणे आपण रशियात अनेक मार्ग वापरून मेन्शेव्हिकांना नष्ट केले त्याचप्रमाणे या मजूर नेत्यांबाबत आपण कठोर झाले पाहिजे. त्यांना आपण इतके बदनाम केले पाहिजे की हे लोक आपले शत्रू आहेत अशी कामगारवर्गाची कल्पना व्हावयास हवी. सर्व कामगारवर्ग केवळ कॉमिन्टर्नच्या कच्छपि लागेल अशी व्यवस्था केल्याशिवाय आपल्याला अभिप्रेत असलेली जागतिक कम्युनिस्ट क्रांती घडून येणार नाही.'

ऑस्ट्रियातील समाजवादी सरकार उलथून पाडण्यासाठी लेनिनने ऑस्ट्रियातील आपल्या हस्तकांकडे बराच पैसा रवाना केला होता ही गोष्ट नंतर पुराव्यानिशी सिद्ध करण्यात आली होती. ती बातमी ऐकताच एडवर्ड बर्नस्टेन हा जर्मन सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचा नेता म्हणाला, 'र्हुर्, बव्हेरिया आणि मध्य जर्मनी येथे जे १९२१ मध्ये कामगारांचे उठाव झाले त्या मागे रशियन कम्युनिस्ट पक्षाचाच हात होता. आता ऑस्ट्रियातही तेच तंत्र अनुसरण्यात आलेले दिसते. यावरून गेल्या वर्षभरात जर्मनी आणि ऑस्ट्रिया येथे कम्युनिस्ट क्रांती घडवून आणण्यासाठी लेनिनने लक्षावधी रूबलसची खैरात केली होती हे आपोआप सिद्ध झालेले आहे. आज जे जर्मनी–ऑस्ट्रियात घडले तेच नंतर इतर देशांतही घडणार आहे.'

लेनिन हयात असताना कॉमिन्टर्नच्या कार्याचा पसारा फारसा वाढला नव्हता. त्याच्या मृत्यूनंतर स्टॅलिनने कॉमिन्टर्नमार्फत आपल्या हस्तकांची एक आंतरराष्ट्रीय यंत्रणा उभारून आणि या यंत्रणेला पैशाची फार मोठ्या प्रमाणावर मदत करून प्रत्येक देश पोखरण्याचे कार्य हाती घेतले. सारे जग कम्युनिस्ट रशियाच्या नियंत्रणाखाली आणण्याच्या महत्वाकांक्षी कार्यक्रमाचा हा एक अपरिहार्य भाग होता.

स्टॅलिनने अवलंबलेल्या या कार्यक्रमाची सारी जडणघडण लेनिनने अगोदरच करून ठेवली होती. (क्रमशः)




# टेनिसची घसरगुंडी

भारताचे सर्वोत्कृष्ट टेनिसपटू रामनाथन् कृष्णन् यांनी जरी आपली निवृत्ती जाहीर केली नसली तरी अलीकडेच अखिल भारतीय लॉन टेनिस संस्थेला त्यांनी आपण यंदाच्या 'डेव्हिस कप' आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धेत भाग घेणार नसल्याचे कळविले आहे. पाठीतील वारंवार दुखण्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला. कृष्णन् यांच्यानंतर भारताचे टेनिस अर्थात प्रेमजितलाल, जयदीप मुकर्जी यांच्या शिरावर पडणार आहे. गेल्या सहा महिन्यांतील त्यांचा फॉर्म बघितला तर मात्र पदरी निराशाच पडते. गेल्या वर्षी 'डेव्हिस कप' मध्ये अंतिम फेरीपर्यंत आपण पोहोचलो होतो. त्यानंतर भारतीय टेनिसला एकदम उतरती कळा लागली. याचे कारण हे खेळ उत्तम शरीरिक आणि मानसिक तयारीचे आहेत. लागोपाठ स्पर्धात्मक सामने खेळल्याने खेळाडूचे शरीर आंबते आणि मन थकून जाते. त्याकरिता काही ठराविक खेळाडूंनाच भारताचे प्रतिनिधित्व सतत न देता नवोदित दर्जेदार टेनिसपटूंनाही संधी देण्याचा प्रयत्न व्हावयास हवा. पुण्याला अठरा वर्षांखालील खेळाडूंचा एक शिक्षण वर्ग काही महिन्यांपूर्वी जी. वसंत आणि अख्तरअल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली भरला होता. त्यातून गौरव मिश्रा, आनंद अमृतराज यांसारखें नवे खेळाडू आशियाई स्पर्धेत चमकून गेले. त्यांच्यावर अधिक नजर भारतीय संस्थेने ठेवावयास पाहिजे.

येत्या मे महिन्यात युरोपच्या दौऱ्यावर तीन खेळाडूंचा भारतीय संघ जाणार आहे. त्याऐवजी चार खेळाडू नेऊन नव्या दोघांना संधी देणे इष्ट ठरेल. त्याचप्रमाणे भारतीय संस्थेने एक छोटचा टेनिस खेळाडूंचा संघ ऑस्ट्रेलियाला पाठविण्याचे ठरविले आहे. ऑस्ट्रेलियाचे सुप्रसिद्ध टेनिसपटू आणि शिक्षक मि. हॅरी हॉप्मन त्यांना टेनिसचे धडे देतील. सध्या ऑस्ट्रेलियाचा संघ टेनिसमध्ये सर्वश्रेष्ठ असल्याने ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यात भारतीय खेळाडूंना एक नवी दृष्टी येईल. त्या दृष्टीने भारतीय संस्थेचा निर्णय योग्य आणि परिणामकारक आहे.

[पृष्ठ ६४ वर]

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

२३ ते २९ मार्च राशि-भविष्य

**मेष :** निष्ठेचे आणि निर्धाराचे व्रत आचरीत असलेल्यांना ग्रहांच्या इष्टानिष्टतेची फारशी पर्वा करायचे कारणही नाही. आणि हे अंतरिक्षातील ग्रह अशा माणसांच्या वाटेला जायचे धाडसही सहसा करीत नाहीत.

या वेळी एकटया गुरूशिवाय कोणत्याही ग्रहाची सहानुभूती आपणांस लाभण्याची शक्यता नाही. थोडयाफार अडचणी येतील, धावपळ, धडपड खूपच करावी लागेल. अनेक विरोधकांशी दोन हात करावे लागतील. पण अपेक्षित यश पदरी पाडून घ्यालच.

काही वस्तू हरवणे, नुकसान येणे, खोटेनाटे आरोप येणे, प्रकृती बिघडणे असले सुद्धा काही प्रकार मधूनमधून अनुभवावे लागतील. पण अशा गोष्टीची दखल घ्यायला तुम्हांला वेळच कुठे आहे ?

दि. २४ ते २७ मार्च या काळी अनेक कार्यांत घवघवीत यश लाभेल.

**वृषभ :** लाभस्थानी जमलेल्या ग्रहांत किती अचाट सामर्थ्य साठवलेले असते याचा हातोहात प्रत्यय आला असेल व येईलही. मंगळाने फक्त पक्षांतर केलेले असल्याने विरुद्ध पक्षाला थोडे अधिक बाळसे आल्यासारखे जाणवेल पण त्याचा काही तुमच्या पक्षावर फारसा परिणाम होणार नाही.

हा आठवडा खूपच धाईगर्दीचा, धावपळीचा जाणवेल. अनंत कामांचे डोंगर तुम्हांला उपसावे लागतील. राजकीय आघाडी प्राणपणाने झगडावी लागेल. सामाजिक प्रतिष्ठा टिकवण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल.

हे सारे करावे लागले तरी यश अपेक्षेप्रमाणे पदरी पाडून घ्यालच.

हा काल अतिशय खर्चाचा जाणवेल. आवक मंदावेल. खर्च मात्र सहस्र मुखांनी वाढू लागेल.

दि. २७ ते २९ मार्च या काली अनपेक्षितपणे हाती पैसा येईल.

**मिथुन :** अंतरिक्षीय सारी ग्रहस्थिती तुमच्यावर खूष दिसते. त्यांच्या कृपेला तुमच्या कर्तृत्वाची किनार जोडलीत तर जगाच्या नजरा तुमच्यावर खिळून राहतील असे काही भव्य दिव्य घडवून आणू शकाल. आजवर आपण खडतर मार्गा-

वरून पायपीट केलीत आता आपण रम्य भविष्यकालाच्या उंबरठ्यावर पाऊल टाकीत आहात. भंगलेल्या बऱ्याचशा आशा आकांक्षा आता आपण साधू शकाल.

नव्या आशा अंकुरायला लागतील, प्रगतीचे नवे क्षेत्र हस्तगत कराल. साहित्य-कला-राजकारण ही तर तुमची खास क्षेत्रे. त्यात आवाज उठविण्याची संधी कित्येक दिवसांनंतर आपणांस लाभत आहे. त्या संधीची दखल घेतलीत तर अपेक्षासाफल्याचा काळ हाच असे आपणांस वाटू लागेल.

दि. २४ मार्चच्या गुरुमंगळ त्रिकोणापासून सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल.

कर्क : भाग्यस्थानी सूर्याचे आगमन घडले आणि ग्रहांनी तुमचा भाग्यलेख लिहा-वयास सुरुवात केली. आता आपण आपले ईप्सित सहजासहजी सिद्धीस नेऊ शकाल. माघार, कचखाऊपण, घोळ घालीत बसण्याची प्रवृत्ती हे सारे इतिहासजमा झाल्यासारखे जाणवू लागेल. दशमातील एकटा मंगळही आपल्या अपेक्षा सफल करायला समर्थ ठरेल.

यांत्रिक विद्युत्-क्षेत्राशी आपले जीवन निगडित होईल, नवे आणि आकर्षक असे काही करून दाखवावे अशा ऊर्मी अंतःकरणात उसळू लागतील.

सामाजिक महत्त्व वाढीस लागेल, राजकीय प्रतिष्ठा बरीच उंचावेल, सारे हित-शत्रू मागील दाराने पसार व्हायला लागतील.

२७ ते २९ मार्च या कालीच माझ्या म्हणण्याचा आपणांस प्रत्यय यावा.

सिंह : मंगळ म्हणजे तुमचे सारसर्वस्व. तो भाग्यस्थानी आला आणि तुमच्या साऱ्या विवंचना मिटल्या. १९ मार्च पासूनच ही महन्मांगल्याची ग्रहस्थिती तुमच्या वाट्यास आलेली आहे. अष्टमस्थानाचे ग्रह थोडा विरोध आणि मतभेद वाढव-तीलही पण त्यांची आता आपणांस फारशी दखल घ्यायची गरज उरणार नाही.

काल अनुकूलतेकडे झुकू लागलेला आहे. आपली निष्ठा अभंग आहे. एवढे भांडवल लोकोत्तर अभिनव कार्य घडवून आणण्यास पुरेसे आहे. या आठवड्यातच आपला प्रवास घडेल, आणि त्या प्रवासानेच आपली प्रगती वेग घेऊ लागेल.

२४ ते २८ मार्चपासून प्रगतीकडे पावले पडू लागतील.

कन्या : अंतरिक्षात घडलेली आणि घडणारी राश्यंतरे तुमच्या नित्यनैमित्तिक कार्यक्रमावर विशेषतः चांगला परिणाम घडवून आणतील असे दिसत नाही. त्याच अडचणी- त्याच विवंचना. उलट आठव्या मंगळामुळे त्याची तीव्रता अधिकच वाढण्याचा संभव आहे. काही काल या दिव्यातून आपणास जावे लागणार आहे. उद्वेग, नैराश्य, दौर्बल्य यांनी मनाला वेढा घातल्यासारखे जाणवायला लागेल. वैचारिक संघर्ष पेटेल, व्यावहारिक, कटुता वाढू लागेल, अनारोग्याची बोचणीही मधूनमधून जाणवेल.

या काली ईर्षा धरलीत– निर्धाराने पाऊल उचललेत तरच तुमचा निभाव लागेल. हवामान अनुकूल नाही याची सतत जाणीव ठेवून अनेकांचे सहकार्य घेतलेत तरच वेळ भागून जाईल.

दि. २४ ते २६ मार्च एवढाच काल काहीसा बरा आहे.

**तूळ :** रवि-मंगळ-शनी साऱ्याच समर्थ ग्रहांनी तुमच्याकडे पाठ फिरवली आहे. त्यांची सहानुभूती तर नाहीच. उलट विरोध झाला नाही तर मिळवली.

अशा वेळी आपणही आपल्या व्यवसाय धंद्याचे तंत्रमंत्र बदलायची तयारी ठेवायला हवी. सातव्या मंगळामुळे, भागीदारीचे व्यवहार बिघडू लागतील, कौटुंबिक वातावरणही अस्वस्थ होऊ लागेल.

जेथे जेथे मतभेदाचे वातावरण निर्माण होईल तेथे तेथे सरळ सरळ माघार घेण्याची तयारी ठेवली तरच अनवस्था प्रसंग टळेल.

नव्या जबाबदाऱ्या वाढवून घेऊ नका. आणि मोठ्या व्यवहाराला हात लावू नका. कित्येक व्यवहारांत जुळते मिळते घेण्याची मनोवृत्ती ठेवा. दूरचा प्रवास शक्य तो टाळाच.

दि. २४, २५, २८, २९ मार्च या काळात थोडेफार व्यावसायिक यश पदरी पडेल.

**वृश्चिक :** आता यापुढे ग्रहांनी आपणांस अनुकूल कौल द्यायचे ठरविलेले दिसते. तुम्ही त्यांना प्रयत्नाची साथ दिलीत की, अशक्यावरही आपण सहजासहजी मात करू शकाल. आजवरचे प्रगतीचे न सुटलेले गणित आता फारसा ताण न पडताही सोडवू शकाल.

२४ मार्चच्या गुरु-मंगळ त्रिकोणापासून जेथे जेथे आपण जाल तेथे तेथे आशादायक वातावरण स्पष्टपणे दिसायला लागेल.

संशोधन, विज्ञान, अर्थशास्त्र, परराष्ट्रीय राजकारण या विभागांत आपले स्थान बरेच उंचावेल. सांपत्तिक ताणही पूर्वीइतका जाणवू शकणार नाही. नोकरीधंद्यांत पुढे पाऊल पडेल.

दि. २४, २६, २८ या कालाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

**धनू :** चतुर्थातील भांडखोर ग्रहांच्या साठमारीचा आणि त्यांच्या लठ्ठालठ्ठीचा तुमच्या स्वास्थ्यावर परिणाम झालाच आहे. अस्वस्थ व निराशाजनक वातावरणातून तुम्हांला जावे लागत आहे. एकच समाधानाची गोष्ट मंगळ त्या इतर अनिष्ट ग्रहांतून फुटून निघाला असल्याने या आठवड्यापासून अनिष्ट कालाची उग्रता पुष्कळशी कमी भासू लागेल.

२४ मार्चच्या गुरु-मंगळ त्रिकोणापासून भंगलेल्या अपेक्षा सांधू शकतील अशी आशा अंकुरायला लागेल.

यांत्रिक-तांत्रिक उद्योगधंद्यांची स्थगित प्रकरणे आता गती घेऊ लागतील.

विरोधकांचा हृदयपालट झाल्यासारखे जाणवू लागेल. अनेकांचे हार्दिक सहकार्यही लाभण्याची लक्षणे दिसू लागतील.

दि. २४ ते २७ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**मकर :** पराक्रमस्थानी रवि-शनीसारख्या अनेक ग्रहांची उपस्थिती असताना चौथ्या मंगळाची डर कशाला ? धावपळ धडपड थोडीफार अधिक करावी लागेल इतकेच.

हा आठवडाही गेल्या १५–२० दिवसांप्रमाणेच खूपच घाईगर्दीचा जाणवेल. अनंत कार्यक्रम यशस्वी करावे लागतील. राष्ट्रीय कार्यक्रमात सतत आघाडीवर राहावे लागेल. कर्तृत्वाला उत्थान देणारे एक निराळेच क्षेत्र निर्माण करण्यासाठी अनेकांचे सहकार्य घ्यावे लागेल.

शैक्षणिक क्षेत्रात – वैज्ञानिक विभागात तुम्हांला प्रतिस्पर्धीच उरणार नाही. २४ मार्चच्या गुरु-मंगळ त्रिकोणापासून अनेक नव्या योजना आकार घ्यायला लागतील.

दि. २४, २७, २८ या काळी अपेक्षित यश मिळावे.

**कुंभ :** १९ मार्चला मंगळ आपल्या राशीच्या पराक्रमात आला. तो आता तुमच्या मनातील सारा निराशावाद–उद्वेग–विकल्प सारे झाडून काढील आणि चित्तात आशावाद रुजवील.

अनिष्टांतूनही इष्ट शोधून काढण्याची प्रवृत्ती ठेवलीत तर या आठवड्यापासून आपण भरीव व निश्चित स्वरूपाचे कार्य करू शकाल.

साडेसातीच्या शेवटच्या तडाख्याने क्षणभर भोवळ आल्यासारखे जाणवले तरी मन उत्साहाने, नव्या जोमाने कार्यतत्पर करायला या वेळचा गुरु-मंगळ त्रिकोण आपणांस सहाय्यक ठरेल. प्रवास घडेल, विचार यशस्वी ठरतील, नवे कार्यक्षेत्र हाती येईल, पैशाअडक्याची विवंचनाही मिटेल.


दि. २४, २६, २८ या काळाचे महत्त्व अधिक जाणवेल.

**मीन :** साडेसातीतील अधिकाधिक अनिष्ट काल सध्या आपण अनुभवीत आहात. नैराश्य, उदासीनता, अस्वस्थता, अनारोग्य इ. प्रकार सहन करावे लागतील. साडेसातीत हे अपेक्षित असतेच. काही काल जपून–सावधगिरीने वागल्याशिवाय गत्यंतर नाही.

या काली दूरचा प्रवास टाळा. पैशाअडक्याचे व्यवहार फारच सावधगिरीने हाताळा. कोणत्याही क्षणी हानीचे, अपेक्षाभंगाचे प्रकार उद्भवण्याची शक्यता आहे. कौटुंबिक संघर्ष आणि व्यावसायिक मतभेद यांना तर अक्षरशः या वेळी ऊत येईल.

मानसिक विवंचना वाढवणाऱ्या अनेक घटना प्रत्यही घडायला लागतील.

दि. २४ ते २७ या काली काहीशा अनुकूल गोष्टी घडाव्यात. ○



जनरल मॉंटगोमेरी

# मॉं टी ज़ ड ब ल

४४ साल उजाडले. महायुद्धाचा उत्तरार्ध सुरू झाला. युद्ध चोहोबाजूने पेटले होते. दोस्तांच्या बाजूने काही अनुकूल फासे पडून हिटलरची पीछेहाट सुरू झाली होती. पण तरीही युद्धाचा अंदाज बांधणे कठीण होते.

१

अनुवाद
अनन्त भावे

याच सुमारास दोस्तांच्या गोटात एक नवी योजना आकार घेऊ लागली. त्यानुसार दोस्तांच्या फौजा फ्रान्सच्या किनाऱ्यावर उतरून बर्लिनला धडक मारणार होत्या. योजना प्रचंड होती. योजनेचा मुख्य सूत्रधार होता जनरल मॉंटगोमेरी. आफ्रिकेच्या रणांगणात रोमेलला धूळ चारणारा इंग्लंडचा सेनानी.

योजना हळूहळू पक्की होऊ लागली. आणि मॉंटगोमेरीच्या आयुष्यात एक नाटयपूर्ण घटना घडली. खरं तर या घटनेला त्याच्या जीवनाचा केवळ आधार

होता. घटना घडली होती पगारखात्यात एक सामान्य कारकून म्हणून काम करणाऱ्या ले. क्लिफटन जेम्स याच्या आयुष्यात. हाच सामान्य माणूस जनरल माँटगोमेरीचा तोतया म्हणून काही काळ वावरला. युद्धकाळात अत्यंत जोखमीची कामगिरी त्याने सांभाळली. ही जनरल माँटगोमेरीची भूमिका वठवताना त्याला आलेले अनुभव त्यानेच 'आय वॉज माँटीज डबल' या आपल्या पुस्तकात लिहिले. त्या पुस्तकाचा हा स्वैर अनुवाद.



ले. क्लिफटन जेम्स

१९४४ सालच्या मे महिन्यातील एका सकाळी या अद्‌भुत कहाणीला सुरुवात झाली. इंग्लंडमध्ये, लिसेस्टर येथील सैनिकी पगारखात्यात कारकुनी करणारा ले. क्लिफटन–जेम्स कार्यालयात आपल्या टेबलाजवळ बसून दैनंदिन काम करीत असताना अचानक टेलिफोनची घंटा खणखणली.

जेम्सने टेलिफोन उचलला. पलीकडून आवाज आला, "हॅलो जेम्स, मी कर्नल डेव्हिड निवेन (प्रख्यात ब्रिटिश नट) बोलतो आहे. सैनिकी चित्रपट विभागातून बोलतो आहे...सैनिकांच्या मनोरंजनासाठी तुम्ही केलेल्या कार्यक्रमाबद्दल मी पुष्कळ ऐकलं आहे. ते फार चांगले असतात, असं बऱ्याच जणांचं मत आहे...आपण सैनिकी चित्रपट करण्याच्या बाबतीत आम्हाला काही मदत करू शकाल काय? आम्ही आपल्यासारख्याच माणसाच्या शोधात होतो; आणि कोणीतरी तुमचं नाव सुचवलं!"

जेम्स आश्चर्यचकित झाला. त्याला वाटले कोणीतरी आपली थट्टाच चालवली असावी. परंतु आवाज तर डेव्हिड निवेनचाच होता. तो आवाज न ओळखण्याइतका जेम्स अनभिज्ञ नव्हता. त्याने फोनवरून तत्काळ संमती दर्शवली.

डेव्हिड निवेन पुढे म्हणाला, "मी फोन केला होता असं तू आपल्या वरिष्ठांना सांग. त्यांच्याकडून एक आठवडयाची खावी रजा मिळव आणि लंडनला ये. यासंबंधीचं पत्र मी लगेच पाठवून देतो."

फोन खाली ठेवला तरीही जेम्सचा घडलेल्या प्रसंगावर विश्वास बसत नव्हता. १९३९ साली, जेव्हा महायुद्ध सुरू झाले तेव्हा सैनिकांचे मनोरंजन करण्याचे काही काम करावे या उद्देशाने जेम्सने सैन्यभरतीचा अर्ज केला होता. तो उद्देश लक्षात न घेता त्याला पगारखात्यात काम मिळाले होते. आणि आकडेमोडीशी तर जेम्सचा छत्तिसाचा आकडा होता!

जेम्सची भरती होऊन पगारखात्यात रुजू होताना मुलाखतीसाठी ज्या वेळी तो वरिष्ठ अधिकारी असलेल्या कर्नलपुढे उभा राहिला त्या वेळी कर्नल त्याला म्हणाला होता, "जेम्स, पहिल्या महायुद्धात जवान म्हणून तू भाग घेतला होतास हे मला माहीत आहे. पण या खेपेला अगदी वेगळया प्रकारचं सैनिकी जीवन जगण्याची तयारी तुला ठेवली पाहिजे."

कर्नलच्या शब्दांत दडलेल्या विलक्षण भवितव्यतेची जेम्सला त्या वेळी कल्पनाच नव्हती. त्या भवितव्यतेपोटी त्या करडया कर्नलला केवढा मनस्ताप सोसावा लागणार होता!

कर्नलच्या हुकुमावरून जेम्स आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यासमोर जाऊन उभा राहिला. त्या अधिकाऱ्यान त्याची चौकशी करायला सुरवात केली. "तू बँकेत कामाला होतास काय?"

"नाही."

"मग शेअरबाजार?"

"नाही."

"हिशेबतपासणी?"

"नाही."

" मग--? "

" मी नट आहे ! "

जेम्सचे उत्तर ऐकल्यावर त्या अधिकाऱ्याने असा काही विचित्र चेहेरा केला की, जेम्स पार थिजून गेला.

जातिवंत नट असलेला क्लिफ्टन-जेम्स पगारखात्याच्या नीरस कामाला लवकरच कंटाळला. काही महिन्यांनंतर, सैनिकांच्या मनोरंजनार्थ काही नाटके, तमाशे, प्रहसने करण्याची परवानगी त्याला मिळाली. पण ती फावल्या वेळात. त्याने जेम्सचे समाधान होणे शक्य नव्हते.

## आश्चर्यजनक घटना

याच सुमारास त्याच्या आयुष्यात एक चमत्कारिक घटना घडली. त्याच्या बरोबरीचा एक अधिकारी एकदा त्याच्याकडे न्याहाळून पाहत अचानक उद्गारला " जेम्स, तुला माहीत आहे तू थेट मॉंटीसारखा दिसतोस ! "

" मॉंटी ? "

" होय. मॉंटी. जनरल मॉंटगोमेरी ! "

" अच्छा ! " जेम्सने सहज म्हटले आणि त्या गोष्टीचा त्याने पुन्हा कधी विचारच केला नाही.

परंतु जनरल मॉंटगोमेरीने उत्तर आफ्रिकेमधील युद्धआघाडीवर प्रचंड विजय संपादन केले. मॉंटगोमेरीचे नाव सर्वांच्या ओठांवर खेळू लागले. तोपर्यंत फारसा माहीत नसलेला हा जनरल अल्पावकाशात सर्वख्यात झाला.....एके दिवशी नॉटिंगहॅम येथे जेम्सच्या पथकाचे नाटक चालले असताना काही सूचना देण्यासाठी जेम्स रंगमंचावर आला. जेम्सला पाहताक्षणी प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. आरडाओरड आणि चीत्कार यांनी प्रेक्षागृह भरून गेले. जेम्सला हे स्वागत अनपेक्षित होते. गंमत अशी झाली होती की, जेम्सला जनरल मॉंटगोमेरी समजून सैनिकांनी त्याचे हार्दिक उत्स्फूर्त स्वागत केले होते. जनरल मॉंटगोमेरीच त्यांच्याशी बोलायला रंगमंचावर आला आहे, अशी त्या शेकडो सैनिकांची अगदी दृढ समजूत झाली होती !

या प्रसंगाचेदेखील जेम्सला विस्मरण झाले होते. परंतु त्यानंतर थोड्या दिवसांनी लंडन येथे त्याने काही नाट्यप्रयोग सादर केले होते. एका प्रयोगानंतर कोण्या एका छायाचित्रकाराने जेम्सला गाठले. आपला कॅमेरा सरसावीत तो म्हणाला, " कोणीतरी मला सांगितलं की, आपण जनरल मॉंटगोमेरीसारखे दिसता आणि आता तुम्हांला प्रत्यक्ष पाहिल्यावर मलासुद्धा तसंच वाटू लागलंय. मी आपला फोटो काढू काय ? "

कोणाकडून तरी त्या छायाचित्रकाराने जनरल मॉंटगोमेरी वापरत असे तशी बेरेट घेतली. ती डोक्यावर चढवून जेम्स फोटोला उभा राहिला. फोटो काढून

फोटोग्राफर निघून गेल्यानंतर मात्र जेम्सला भीती वाटू लागली. तशी बेरेट वापरण्याचा त्याला अधिकार नव्हता. तसा त्याचा फोटो कोणी पाहिला असता तर त्याच्यावर शिस्तभंगाचा आरोप सहज ठेवला गेला असता.

दोन दिवसांनी 'न्यूज क्रॉनिकल' या वर्तमानपत्रात जेम्सचा तो बेरेट घातलेला फोटो खरोखरच झळकला. फोटोवर शीर्षक होते. 'जनरल मॉंटगोमेरी? छे: चुकलात तुम्ही. हा आहे ले. क्लिफ्टन-जेम्स' जेम्सच्या सुदैवाने फारसा कोणी तो फोटो पाहिला नव्हता.

यानंतर मात्र जेम्स पगारखात्यातील कामाच्या रगाड्यात गढून गेला. ते काम त्याच्या प्रकृतीला मानवण्यासारखे नव्हते. त्यामुळे त्याला फार कंटाळा यायचा. पण आपल्या मातृभूमीसाठी आपण ते करायलाच पाहिजे, हा विचार त्याला दिलासा द्यायचा. असे कित्येक दिवस गेले. महिने गेले. दोन-तीन वर्षेदेखील उलटली.

आणि १९४४ सालच्या मे महिन्यात एके दिवशी मागे सांगितलेला डेव्हिड निवेनचा फोन आला. आता तरी आपल्या आवडीचे काम मिळेल अशी आशा जेम्सला वाटू लागली. त्या कामाची चित्रे तो डोळ्यांसमोर रेखाटू लागला. परंतु पगारखात्यातून सुटका होणे ही अत्यंत कठीण गोष्ट होती. अनेकांनी वेगवेगळ्या सबबी सांगून या खात्यातून बदली करण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यात फारसे कोणाला यश आले नव्हते आणि जेम्सला तर बदली हवी होती. चित्रपटखात्यात चित्रपटात काम करण्यासाठी, असल्या फालतू कामासाठी सन्मानपूर्वक त्याची बदली होणे कसे शक्य होते!

सारे धैर्य एकवटून जेम्स कर्नलसमोर गेला. हा कर्नल मोठा शिस्तबाज आणि करडा इसम होता, आपल्या खात्याच्या कार्यक्षमतेबद्दल त्याला मोठा अभिमान होता; आणि आपल्यामुळेच ती कार्यक्षमता अबाधित राहते अशी त्याची दृढ समजूत होती.

हे सगळे आठवून जेम्स विनम्र आवाजात म्हणाला, "लंडनच्या सैनिकी चित्रपट विभागातून मला बोलावणं आलं आहे साहेब."

"कशाला? काय पाहिजे त्यांना?"

"ते काही मला माहीत नाही नीटसं. पण डेव्हिड निवेनचा फोन होता साहेब."

"डेव्हिड निवेन? म्हणजे तो कोणीसा सिनेमाबिनेमात काम करतो तो ना?"

"होय. लंडनला जाऊन सिनेमा काढण्यात मी त्याला मदत करावी अशी त्याची इच्छा आहे. त्यासाठी मला सात दिवसांची रजा हवी होती साहेब."

हे ऐकल्यावरोबर कर्नल खवळला. मोठ्याने ओरडून म्हणाला, "सात दिवसांची रजा? आणि तीसुद्धा सिनेमा काढण्यासाठी? हे पगारखातं आहे; फिल्म स्टुडियो नाही."

"पण साहेब ते तर म्हणत होते की, ते यासंबंधी आवश्यक ते पत्र पाठवणार

आहेत म्हणून."

"पत्र पाठवणार म्हणतात? ठीक आहे. पत्र आल्यावर मग भेट तू मला."

कर्नलच्या खोलीतून बाहेर पडताना जेम्स अगदी निराश झाला होता. पगार-खात्यातून सुटका होण्याचा विचार सोडून देऊन, टेबलाशी बसून दैनंदिन कामात रमण्याचा यत्न तो करू लागला.

परंतु दुसऱ्या दिवशी डेव्हिड निवेनचा पुन्हा फोन आला. आणि त्याचा उत्तेजक आवाज ऐकल्याबरोबर जेम्सची आशा पुन्हा पल्लवित झाली. डेव्हिड निवेनच्या सांगण्यावरून कोणी लेस्टर नावाचा एक कर्नल ग्रँड हॉटेलमध्ये जेम्सची भेट घेणार होता. जेम्सने त्याला भेटावे, बरोबर स्वतःचे काही फोटो आणावेत असे डेव्हिड निवेनने कळविले होते. रजा मिळण्याबाबतची जेम्सच्या मनातली भीतीसुद्धा डेव्हिड निवेनने घालवून टाकली होती.

## लेस्टर भेट

दुसऱ्या दिवशी ग्रँड हॉटेलकडे जाताना जेम्सच्या मनाचा गोंधळ उडाला होता. अधिकारिवर्गाविषयी त्याच्या मनात पहिल्यापासून भीती होती.

ही भीती पोटात ठेवूनच तो लेस्टरची प्रतीक्षा करीत होता. कल्पनेने कर्नल लेस्टरचे भयंकर भीतिदायक चित्र त्याने उभे केले होते. पण प्रत्यक्षात मात्र कर्नल लेस्टर अत्यंत साधा आणि मनमोकळा आहे असे त्याला आढळून आले.

लेस्टरने त्याला बारमध्ये नेले. मद्य घेता घेता एकंदर युद्धपरिस्थिती आणि सैनिकांच्या मनोरंजनार्थ जेम्स करीत असलेले नाट्यप्रयोग यांच्याबद्दल त्यांची दिलखुलास चर्चा चालली होती, जेम्सच्या सुदैवाने कर्नल लेस्टरला रंगभूमीविषयी पुष्कळच माहिती होती. त्यामुळे त्यांचे संभाषण चांगलेच रंगले.

अचानक बरोबर आणलेल्या फोटोंचे जेम्सला स्मरण झाले. त्याने ते लेस्टरच्या हाती दिले. लेस्टरने त्याच्यावर एक ओझरता दृष्टिक्षेप टाकला आणि "ठीक आहे. चालतील हे फोटो" असे म्हणून ते जवळच्या बॅगेत ठेवून दिले. त्यानंतर थोड्याच वेळात लेस्टरने जेम्सचा निरोप घेतला.

कर्नल लेस्टर गेल्यानंतर मगच जेम्सच्या ध्यानात आले की, चित्रपटासंबंधी त्यांचे थोडेसुद्धा बोलणे झाले नव्हते. याचा अर्थ काय असावा? कदाचित त्या कामाला आपण योग्य नाही हे कर्नल लेस्टरला पटले असावे. जेम्सला सारखे असेच वाटत राहिले.

परंतु तिसऱ्या दिवशी डेव्हिड निवेनचे पत्र आले. त्यात जेम्स कामाला योग्य आहे असा उल्लेख होता, आणि त्याकरिता त्याला ताबडतोब लंडनला बोलावले होते.

डेव्हिड निवेनचे पत्र दाखवल्यावर त्या करड्या कर्नललासुद्धा जेम्सला रजा देणे भाग पडले. मोठ्या आनंदाने जेम्स घरी गेला आणि आपल्या पत्नीला—ईव्हला—ही

सुवार्ता त्याने सांगितली. दुसऱ्या दिवशी त्याच्याबरोबर तिनेदेखील लंडनला जाण्याचे ठरवले. लंडनमध्ये हॅम्पस्टेड विभागात डेव्हिड सेंडर नावाचा जेम्सचा एक जुना मित्र राहत होता. त्याच्याकडे मुक्काम करण्याचे जेम्स पती-पत्नींनी निश्चित केले.

डेव्हिड निवेनने सांगितलेल्या पत्त्यावर ईव्हसह जेम्स येऊन पोहोचला. तेथे त्याची डेव्हिड निवेनशी भेट झाली. काही वेळाने निवेनने जेम्सला एकट्यालाच त्या इमारतीमधील दूरच्या एका रिकाम्या खोलीत नेले आणि तेथे त्याला थांबायला सांगून डेव्हिड निवेन निघून गेला.

ती खोली बरीच मोठी होती. मध्यभागी एक लांबलचक टेबल व टेबलाच्या भोवती खुर्च्या मांडलेल्या होत्या. जेम्स इतका बावरला होता की, तो खुर्चीवर स्वस्थपणे बसू शकत नव्हता. अस्वस्थपणे तो त्या खोलीत फेऱ्या घालीत राहिला.

असा थोडा वेळ गेला आणि कर्नल लेस्टर खोलीत आला. त्याने जेम्सला सिगारेट दिली आणि ते दोघे खुर्च्यांवर बसले. पाहता पाहता कर्नल लेस्टरचे स्वरूप एकदम पालटून गेले. आठवड्यापूर्वी जेम्सला भेटलेल्या आनंदी आणि खेळकर लेस्टरच्या जागी एक निष्ठावंत, करडा सेनाधिकारी जेम्स पाहत होता.

"जेम्स" लेस्टर म्हणाला, "आता मी जे सांगेन त्यानं कदाचित तुला धक्का बसेल."

"म्हणजे ?" जेम्स यांत्रिकपणे म्हणाला.

"म्हणजे असं की आपण सिनेमाबिनेमा काही काढणार नाही आहोत !"

हे ऐकून खरोखरच जेम्सला धक्का बसला होता. भलत्यासलत्या उलटसुलट विचारांनी त्याच्या डोक्यात थैमान घालायला सुरुवात केली. परंतु कर्नल लेस्टरने त्याला धीर देत म्हटले, "जेम्स, घाबरू नकोस. सगळं काही ठीक होईल. देशाकरिता काहीही करायला तू तयार आहेस ना ?"

"अलबत" जेम्स तत्परतेने म्हणाला. ⌑

जेम्सच्या आयुष्यात या विलक्षण घटना घडत असतानाच दोस्तांची युरोपमध्ये फौजा उतरवण्याची तयारी जोरात चाललेली होती. ती योजना हळूहळू पक्की होत होती. या योजनेनुसार दोस्तांच्या फौजा फ्रान्सच्या किनाऱ्यावर उतरून बर्लिनला धडक देणार होत्या. ही मोहीम इतकी प्रचंड होती की ती सर्वस्वी गुप्त ठेवणे अशक्यप्राय होते. दोस्तांच्या फौजा कोठे पाय ठेवतील याचा जर्मन युद्धखात्याला अंदाज होता. परंतु आक्रमणाची निश्चित वेळ त्यांना ठाऊक नव्हती. शिवाय कदाचित दुसऱ्याही कोणत्या तरी आघाडीवर आक्रमण केले जाण्याची शक्यता लक्षात घेणे त्यांना आवश्यक होते. परंतु त्यामुळेच त्यांना फसवण्याची थोडीतरी शक्यता होती.

जर्मनांना फसवण्याच्या अनेक योजनांचा साधकबाधक विचार दोस्तांच्या सेनाधिकाऱ्यांनी चालवला होता. परंतु कोणतीच योजना मान्य होत नव्हती. सरतेशेवटी ब्रिटिश गुप्तहेरखात्याने सुचविलेल्या एका योजनेला दोस्त सैन्याचा सरसेनापति जनरल आयसेनहॉवर याने मान्यता दिली. ही योजना अत्यंत साधी पण तितकीच चतुराईची होती. युद्धशास्त्राच्या शेकडो वर्षांच्या इतिहासात अशी योजना कधीच कोणी आखली नव्हती.

## धाडसी योजना

त्या सुमारास जनरल माँटगोमेरीची कीर्ती सर्वत्र दुमदुमत होती. आफ्रिकेमध्ये रोमेलसारख्या प्रथम श्रेणीच्या जर्मन सेनानीला धूळ चारल्यामुळे माँटगोमेरी दोस्त सैन्याचा अभिमानविषय झाला होता. माँटगोमेरीसारखा धडाडीचा आणि अनुभवी सेनापती युद्धाच्या अंतिम अवस्थेमध्ये त्याचे सूत्रचालन करील याची जर्मनांना खात्री होती. हे लक्षात घेऊनच ब्रिटिश गुप्तहेरखात्याने ही योजना आखली होती. त्या योजनेनुसार इंग्लंडच्या दक्षिण किनाऱ्यावर तळ ठोकून असलेल्या जनरल माँटगोमेरीने तो तळ उठवून जगाच्या दुसऱ्याच कोणत्या तरी भागात आपला मुक्काम हलवला आहे असा देखावा करायचा; अर्थात प्रत्यक्षात मात्र जनरल माँटगोमेरीने आपला मुक्काम तेथेच ठेवायचा.

पण असे करायचे म्हणजे जनरल माँटगोमेरीच्या सवयी, त्याचे हावभाव, त्याची चाल, त्याचा आवाज, त्याचा आविर्भाव, त्याचा ढंग या सगळ्यांची तंतोतंत बतावणी करणाऱ्या अभिनयकुशल तोतयाची जरुरी होती! खुद्द दोस्तांच्या सैन्यातले अधिकारीदेखील चकतील इतकी ती नक्कल हुबेहूब वठणे आवश्यक होते, पुष्कळ गाजावाजा करून या तोतया माँटगोमेरीला दौऱ्यावर पाठवायचा, जर्मन गुप्तहेर आणि त्यांचे हस्तक यांच्या नजरेस तो पडेल याची खात्री करायची; म्हणजे जर्मनांचे लक्ष दुसरीकडे वळवून त्यांची प्रतिकारशक्ति क्षीण होणार होती.

जनरल माँटगोमेरीच्या आफ्रिकेमध्ये किंवा अशाच कोठेतरी अकस्मात झालेल्या आगमनाने जर्मन युद्धखाते बुचकळ्यात पडले असते, त्याच्या आगमनाचा आणि संभाव्य आक्रमणाचा संबंध जर्मनांनी निश्चितच जोडला असता. कारण माँटगोमेरीला अशा अनपेक्षित हालचाली करण्याची सवय आहे; किंबहुना त्याच्या अद्वितीय युद्धतंत्राचे ते एक रहस्य आहे, याची जर्मनांना कल्पना होती. त्यामुळे कदाचित डोव्हरची खाडी ओलांडून होणाऱ्या दोस्तांच्या आक्रमणाची योजना मागे पडून माँटगोमेरीच्या नेतृत्वाखाली नवीन आघाडी उघडण्याचा मनसुबा त्यांनी रचला की काय, असा चित्तक्षोभ करणारा प्रश्न जर्मनांच्या समोर उभा राहणार होता.

ही योजना निश्चित झाल्यावर ब्रिटिश गुप्तहेरखात्यावर जनरल माँटगोमेरीचा तोतया शोधण्याची जबाबदारी पडली, आयुष्यभर गुप्तहेरखात्यात काम करणारा

[पृष्ठ ६३ वर]



# अफगाण शामे-मुसीखी

भुलाभाई देसाई प्रेक्षागृहाच्या रंगमंचावरचा दर्शनी पडदा बाजूला झाला. रंगमंचावर झक्कपैकी भारतीय बैठक घातलेली दिसत होती. त्या बैठकीवर तबला–डग्गा, सारंगी, हार्मोनियम, मेंडोलीन अशी आपल्या नजरेस परिचित संगीत–आयुधे मांडून ठेवलेली दिसत होती. पांढरे स्वच्छ लेहंगे, सैलसर सदरे आणि त्यावर लाल रंगाची भरजरी जाकिटे घातलेल्या, तांबूस गोऱ्या रंगाच्या व्यक्ती रंगमंचावरील आपापले वाद्य घेऊन बसल्या आणि अत्यंत प्रसन्न सुरांनी क्षणार्धात वातावरण भरून गेले. अफगाणिस्तानहून सांस्कृतिक भेटीसाठी आलेल्या अफगाण रेडिओ–कलाकारांची ‘ संगीत–शाम ’ सुरू झाली. त्या वाद्यवृंदाने आपल्या देशाचे वातावरण निर्माण करणारे सूर छेडायला आरंभ केला.

वाद्यमेळाचे सूर विरतात न विरतात तोच नखशिखान्त काळचा रंगाचा अस्सल अफगाणी थाटाचा पोशाख केलेली, कमानदार भुवयांची, धुंद डोळचांची एक युवती रंगमंचावर धीमे धीमे पावले टाकीत आली. ‘ हसीन शाहजादी ’ अशा सार्थ नावाने तिची ओळख करून देण्यात आली. परंतु या नहीदनामक ‘ हसीन शाहजादी ’च्या आवाजात मुंबईला थंडीने चांगलाच तडाखा दिला होता. अत्यंत परिणामशून्य झालेली तिची पुश्तु-फारसी लोकगीते तिच्या सौंदर्याचा प्रभाव फिका करून गेली.



उंच–शेलाटचा बांध्याच्या, हिटलर छाप मिशा असलेल्या महंमद सलीम कंदहारींच्या चेहऱ्यावरच्या रेषा माणूस ‘ बुजुर्ग ’ असल्याची साक्ष देत होत्या. आपल्या दिलरुब्याच्या मधुर सुरावटीने

**रशिया-इराण इत्यादी देशांचा दौरा करून भारत-भेटीसाठी आलेल्या या अफगाण कलाकारांनी आपली एक संगीत-मैफल परवाच मुंबईकरांना पेश केली..............**

त्यांनी मैफलीत पुन्हा थोडा रंग आणला. या 'बुजुर्गा' पाठोपाठ तरणेबांड गुलझमन रंगमंचावर आले. हातातल्या डफाच्या साथीवर या गायकाने उंच स्वरात गायला सुरुवात केली तेव्हा पंजाबी ढंगाच्या गाण्यांची प्रकर्षाने आठवण झाली.

हबीझुल्ला खयाल रंगमंचावर आले तेव्हा प्रेक्षागृहातून अफगाणी मंडळींनी टाळ्यांचा कडकडाट केला. अफगाणिस्तानच्या सांस्कृतिक खात्याचे खयालसाहेब उपाध्यक्ष आहेत. भारतात आलेल्या या अफगाणी–सांस्कृतिक प्रतिनिधी मंडळाचे ते नेते होते. अफगाणी संगीत क्षेत्रात त्यांनी गेली वीस वर्षे भरीव कामगिरी केलेली आहे. उस्ताद सलामत अलिखान यांच्याकडे त्यांनी थोडी 'तालीम' घेतली आहे. ज्यांच्या नावातच संगीत आहे अशा खयालसाहेबांनी आवाज भरला—पण त्यांनाही मुंबईच्या थंडीची बाधा झालेली ! दोन लोकगीतानंतर गायलेली त्यांची पहाडी ठुमरी बरी वठली.

कार्यक्रमाचा अर्धा भाग संपत आला होता आणि या वेळपर्यंत तोंडून 'वाहवा' निघावी असे काहीच ऐकायला मिळाले नव्हते. आपल्या भारत सरकारच्या सांस्कृतिक संबंध मंडळाच्या 'कार्यक्षमतेमुळे' प्रस्तुत कार्यक्रमाला फारशी पूर्व-प्रसिद्धी मिळालेली नव्हती. प्रेक्षकांमध्ये काही अफगाणी चेहरे, थोडेसे 'सरकारी' चेहेरे असा कलावंतांना नाउमेद करणारा रिकाम्या प्रक्षागृहाचा देखावा होता. वाद्य-वृंदातल्या साथीदारांच्या लकबी आपल्या-कडच्या साथीदारांसारख्याच मनोरंजन करणाऱ्या होत्या. तबल्यावरचे उस्ताद तबल्याबरोबरच माना हालवताना मधू-



नच प्रेक्षकांची पावती घेत होते. मेंडोलीन-वादक आपली धुंद नजर शून्यात लावून आपले साथीचे काम चोख बजावत होते. आपल्या अफगाणी राष्ट्रीय पोशाखातील साथीदारांच्या मेळाव्यात सूट-बूट घालून ठुमरी गाणारे खयाल साहेब नजरेला खटकत होते.

## रंग पालटला

मध्यंतर संपले आणि बैठकीचा रंगच पालटला. वाद्यवृंदातल्या कलावंतांनी पुन्हा एक खास अफगाण सुरावट ऐकवली आणि सलवार कमीज घातलेली, टपोऱ्या डोळ्यांची एक वयस्क स्त्री शालीनतेने रंगमंचावर आली. त्या बाईच्या एकूण रुबाबाकडे पाहता, 'हिचाही एक जमाना होता' याची जाणीव होत होती. प्रथमदर्शनी चेहरा पाहताच बेटी डेव्हिस या हॉलीवूडच्या अभिनेत्रीचा भास होत होता. बाईच्या बारीकसारीक हालचालींतून खानदान डोकावत होते. अफगाणिस्तानच्या राजघराण्याशी नाते असलेल्या आणि अफगाणी सांस्कृतिक खात्यात अधिकाराच्या जागेवर असलेल्या बगम परवीन यांनी पुश्तु गीत गायला सुरुवात केली, तेव्हा क्षणभर अख्तरबाई-जद्दनबाई यांच्या ध्वनिमुद्रिका ऐकत असल्याचा भास झाला. 'दिल ए दिवाना' नामक फारसी गीत बेगम परवीनसाहिबाने गायले आणि कार्यक्रमाला आल्याचे सार्थक झाले. सुरुवातीपासून मनात साचत आलेले असमाधान कुठल्या कुठे पळाले. बेगमसाहिबाची दोन गाणी संपली आणि त्या 'अदा' करून जायल्या निघाल्या. एवढ्यात निवेदकाने त्या आणखी एक गझल गातील अशी घोषणा केली. बेगम परवीन यांच्या चेहऱ्यावरचे उमटलेले भाव कॅमेऱ्याने टिपण्यासारखे होते. क्षणभर त्यांना निवेदकाच्या आगांतुकपणाचा राग आला. दुसऱ्या क्षणी आपण रंगमंचावर आहोत या जाणिवेने त्या गोंधळल्या. 'आपल्या गाण्याची पावती' म्हणून ही नवी 'फर्माईश' झाली या कल्पनेने लाजल्या आणि चक्क 'अधोवदना' होऊन हळूच पुन्हा बैठकीवर बसल्या. ओढणीच्या टोकाशी बोटांचा चाळा करून त्यांनी साथीदारांकडे पाहिले. पुन्हा एकदा त्यांना हसू फुटले आणि पुन्हा एकदा त्यांनी रसिकांचे कान तृप्त केले.

बेगम परवीन यांच्या गाण्याने निर्माण झालेला आदर त्यांच्या प्रत्यक्ष भेटीत दुणावला. उर्दू बोली त्यांना येत असल्याने आमचा हिंदी-उर्दू संवाद होऊ शकला. बेगमसाहिबा या बुरखा टाकून गायलेल्या अफगाणिस्तानातल्या पहिल्या महिला आहेत हे त्यांच्याकडूनच समजले. उस्ताद गुलाम हुसेन यांच्याकडे त्यांनी गाण्याची तालीम घेतली. अफगाणिस्तानच्या रेडिओवर गेली दहा वर्षे त्यांचे गाण्याचे कार्यक्रम होत आहेत. सोव्हिएट युनियनला जाऊन बेगमसाहेबांनी आपली कला पेश केली आहे.

उस्ताद महंमद उमर वयाच्या आठव्या वर्षापासून रबाब वाजवीत आहेत. साठी उलटून गेलेल्या या कलाकाराच्या हाताची बोटे रबाबच्या तारा छेडताना नजर

खिळवून ठेवतात. अफगाणिस्तानमधील नभोवाणी केंद्राच्या स्थापनेपासून उमरसाहेब तेथे काम करीत आहेत.

### अफगाणी-सैगल

अफगाण रेडिओवर गेली पंचवीस वर्षे गाणारे अब्दुल जलील झलंद आता फारसी, पुश्तू आणि उर्दू गीते गातील असे निवेदकाने सांगितले आणि सुडौल बांध्याचा, देखण्या व्यक्तिमत्त्वाचा एक तरुण रंगमंचावर आला. त्याच्या नजरेतून जबरदस्त आत्मविश्वास प्रकट होत होता. तबलजीबरोबर त्याने एक हलके स्मित केले आणि भरदार आवाजात गायला सुरुवात केली. शब्द अनोळखी असले तरी सूर पूर्ण ओळखीचे होते. 'वक्त' या गाजलेल्या चित्रपटात बलराज सहानींच्या तोंडी टाकण्यात आलेल्या गाण्याचा ढंग या फारसी गीतावरून उचललेला आहे हे समजले. उस्ताद ब्रेश्नानामक एका ख्यातनाम चित्रकाराने या गीताला ही चाल बांधली असून अब्दुल झलंद यांनी ब्रेश्ना यांच्याकडून घेतलेल्या 'तालीमी'त ती हस्तगत केली.

पहिल्याच गीतामध्ये झलंद साहेबांनी फड जिंकला होता. दुसरे होते एक पुश्तू


# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

लोकगीत. आपल्याकडच्या राधाकृष्णाच्या प्रणयकथांप्रमाणे तिकडे लैला-मजनूंच्या विषयाला लोकगीतांमधून सतत चान्स मिळतो. प्रस्तुत पुश्तू गीताची रचना दोन-चार शतकांपूर्वीची होती. झलंद साहेबांनी प्रेक्षकांना ताल धरायला लावून मैफलीत पुरा रंग भरला.

उर्दू गझल झलंद यांच्या गळयातून उमटू लागली आणि साक्षात सैगल समोर गात आहे असे वाटायला लागले. अफगाण शामे मुसीखी (Afghan Musical Evening) मध्ये आपल्या शंभर नंबरी असलीपणाची हा कलाकार खात्री देऊन गेला. अफगाणिस्तानच्या राजघराण्यात जन्मलेल्या झलंद यांनी वयाच्या सातव्या वर्षापासून संगीत-साधना सुरू केली आहे. त्यांच्या पत्नीही अफगाण रेडिओवर गातात. आजवर झलंद यांनी सुमारे ५०० चाली बांधल्या असून त्यांतील सुमारे २०० चाली अफगाणिस्तानात कमालीच्या लोकप्रिय आहेत. पौर्वात्य आणि पाश्चात्त्य संगीताचा अभ्यास असलेले झलंद उस्ताद गुलाम हुसेन उस्ताद फरूख आणि उस्ताद ब्रेश्ना यांच्याकडे गाणे शिकले.एरवी अत्यंत अबोल वाटणारा हा कलाकार सुरांच्या संगतीत एकदम बोलका होतो. आजपर्यंत त्यांनी इराण, सोव्हिएट युनियन, भारत आणि चेकोस्लोव्हाकिया या देशांत आपले कार्यक्रम सादर केले आहेत.

लोकांची अभिरुची पाहून संगीतरचना करावी, असे झलंद यांचे मत आहे. काळाबरोबर कलाकाराने बदलले पाहिजे, असे हा चाळीस वर्षांचा उमदा कलाकार म्हणतो.

सबंध मैफलीत साथ करणाऱ्या उस्ताद महंमद हाशिम यांनी स्वतंत्ररीत्या दहा मिनिटे तबला वाजवून श्रोत्यांना मुग्ध केले. उस्तादजी अफगाणिस्तानच्या सांस्कृतिक विभागातील 'गुलशन वाद्यवृंदा'चे मार्गदर्शक आहेत. मैफलीच्या शेवटी आलेल्या उस्ताद शायदा यांच्या गाण्याने आपल्याकडील तानबाज गायक मंडळींची आठवण झाली. केवळ वयपरत्वे त्यांना शेवटी गाण्याचा बहुमान दिला असावा !

अफगाण रेडिओ कलाकारांतील ही मंडळी बहुतांशी राजघराण्यातील आहेत. हे सगळे हौशी कलाकार आहेत आणि अफगाणिस्तानच्या सांस्कृतिक खात्यामध्ये मोठ-मोठ्या अधिकाराच्या जागांवर काम करीत आहेत. सोव्हिएट युनियन, इराण इत्यादी देशांचा दौरा या कलावंतांनी केला आहे. परंतु झलंद अथवा बेगम परवीन यांच्यासारख्या कलावंतांचा अपवाद सोडल्यास इतर मंडळी अगदी सुमार होती. एके काळी काबूल-कंदहारहून मोगल राजांनी आपल्याकडे आणलेली शास्त्रीय संगीत कला, गझल व ठुमऱ्या आता आपण इतक्या आत्मसात केल्या आहेत की, प्रत्यक्ष संगीताच्या उगमस्थानाहून आलेले संगीत आमच्या संगीतासारखे आहे, असे आपण खुशाल म्हणतो. काळाची गंमत !

अनिल हवालदार

## माँटीज डबल....

[ पृष्ठ ५७ वरून ]

कर्नल लेस्टर, प्रख्यात नाटचसमीक्षक कॅप्टन स्टीफन वॅट्स आणि लेफ्टनंट जॅक हेरसे या तिघांवर ही कामगिरी सोपविण्यात आली होती.

कर्नल लेस्टरने ताबडतोब जगाच्या कानाकोपऱ्यात, माँटगोमेरीचा तोतया शोभेल अशा माणसाचा शोध चालविला. स्टीफन वॅट्सने हॉलिवुडच्या कोण्या नटाशी संधान बांधले, परंतु तो फारच उंच असल्यामुळे आणि त्याचा आवाज माँटीच्या आवाजाशी जुळता नसल्यामुळे त्याचाही उपयोग झाला नाही. इंग्लंडमधील बारा नट आणि इतर व्यक्तींची चाचणी घेण्यात आली. पण योग्य माणूस मिळेना.

वस्तुत: 'अशक्य' हा शब्द सैन्याच्या कोशात नसतो, माँटगोमेरीचा तोतया शोधण्याच्या बाबतीत मात्र 'अशक्य' म्हणण्याची पाळी येते की काय, असे गुप्त-हेरखात्याला वाटू लागले.

एके दिवशी रात्री आपल्या बिछान्यावर पडून याच प्रश्नाचा विचार करीत असताना स्टीफन वॅट्सला अचानक काही वर्षांपूर्वी वर्तमानपत्रात पाहिलेल्या एका मजेदार छायाचित्राचे स्मरण झाले. माँटगोमेरीसारखी बेरेट घातलेल्या कोणातरी इसमाचे छायाचित्र होते ते ! आणि त्याच्यावर शीर्षक होते : 'जनरल माँटगोमेरी ? छे: ! चुकलात तुम्ही. हा तर आहे लेफ्टनंट...लेफ्टनंट...' काही केल्या वॅट्सला त्या लेफ्टनंटचे नाव आठवेना. ज्या वर्तमानपत्रात त्याने ते छायाचित्र पाहिले होते त्याचेही नाव त्याला आठवत नव्हते. परंतु आता त्याला अंधुक का होईना पण आशेचा किरण दिसला होता. दुसऱ्या दिवशी त्यान अनेक वर्तमानपत्रांच्या गेल्या काही वर्षांतल्या फायलींचे ढिगारे उपसले. आणि दीर्घ प्रयत्नानंतर लेफ्टनंट क्लिफ्ट-जेम्सचे ते छायाचित्र ज्या 'न्यूज क्रॉनिकल'च्या अंकात प्रसिद्ध झाले होते तो अंक त्याच्या हाती आला ! त्यानंतर जेम्सचा शोध घेणे फारसे कठीण नव्हते. तो शोध होऊन जेम्सची प्राथमिक चाचणी घेतल्यानंतर त्यात तो यशस्वीदेखील झाला होता, आणि त्यालाच लेस्टरने 'देशाकरिता काहीही करायला तू तयार आहेस ना ?' असा प्रश्न विचारला होता.

त्या प्रश्नाला जेम्सने अर्थातच होकारार्थी उत्तर दिले. तो पुढे म्हणाला, "मी पहिल्या महायुद्धात भाग घेऊन सीमेच्या लढाईत जायबंदी झालो आहे. त्यामुळं या लढाईत प्रत्यक्ष भाग घेता येणार नाही मला."

"ते सारं मला माहीत आहे. तुझ्या आजवरच्या आयुष्याचा सर्व आराखडा मला माहीत आहे." लेस्टर शांतपणे म्हणाला आणि त्याने गुप्ततेसंबंधीची अधिकृत शपथपत्रिका जेम्सच्या हातात दिली. तो पुढे म्हणाला, "हे तू काळजीपूर्वक वाच. आणि त्याचा मथितार्थ ध्यानात घेऊन त्याच्यावर सही कर."

थरथरत्या हाताने जेम्सने कागद घेतला. हाच कागद व त्यावरील मजकूर त्याचे पुढील आयुष्य बदलून टाकणार होता. [अपूर्ण]

## क्रीडांगण

[पृष्ठ ४५ वरून]

भारतीय टेनिस एका वर्षातच घसरण्याला दोन कारणे आहेत. एक तर कृष्णन्, मुकर्जी आणि लाल हे सर्वोत्कृष्ट टेनिसपटू निष्प्रभ ठरले आणि त्यांची जागा दुसरे कोणी घेऊ शकले नाहीत. दुसरे असे की विजयाचे समाधान मानीत असता नव्या खेळाडूंचा आंतरराष्ट्रीय स्पर्धेकरिता आम्हांला उपयोग करून घेता आला नाही. तेव्हा आता जुन्या टेनिसपटूंचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन देशातील पाच ठिकाणी टेनिसचे शिक्षण-वर्ग उघडून पुष्कळ नवोदित खेळाडूंना त्यात संधी द्यावी. त्यातून निवडक खेळाडू काढून त्यांच्यावर एका ठिकाणी पुन्हा दुसरा शिक्षण-वर्ग काढून लक्ष केंद्रित करावे. नव्या आणि जुन्या पिढीचा सतत संपर्क साधला गेला तर भारतीय टेनिसला पुन्हा एकदा उजळा मिळेल आणि कधीतरी मिळालेल्या विजयाचे समाधान जे क्षणिक टिकते ते तसे राहणार नाही.


### समाधानकारक विजय

न्यूझिलंडमध्ये भारतीय क्रिकेट संघाने डचुनेडिन येथे पहिल्या कसोटी सामन्यात ५ गडी राखून परदेशीय दौऱ्यामधील गेल्या पस्तीस वर्षांतील पहिलाच विजय संपादन केला. त्याबद्दल कर्णधार पतौडींचे अभिनंदनच करावयास पाहिजे. वेस्ट इंडिज, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या सात कसोटी सामन्यांत पराभव पत्करल्यानंतर भारतीय क्रिकेटमध्ये एक वैफल्यवाद निर्माण झाला होता. त्याला काहीशी कलाटणी या समाधानकारक विजयाने मिळाली आहे. कर्णधार पतौडीच्या नबाबांनी आतापर्यंत २६ कसोटी सामन्यांत भारताचे नेतृत्व केले. लाला अमरनाथ यांच्यापेक्षा ११ कसोटी सामने त्यांनी नेतृत्वाच्या बाबतीत अधिक पाहिले. पतौडींच्या नेतृत्वात अनेक मूलभूत चुका आढळतात तरीपण त्यांची तरुण वयातील जिद्द वाखाणण्यासारखी आहे. प्रतिकूल परिस्थितीत झगडत आणि लढत राहायचे आणि तेही चमकदारपणे हे त्यांचे खास वैशिष्टच आहे. ६२ साली वेस्ट इंडिजमध्ये त्यांच्याकडे संघनायकत्व आल्यानंतर त्यांनी आपल्या फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणाने एक नवा मनू भारतीय क्रिकेटमध्ये निर्माण केला. हजारे-मर्चंट यांची फलंदाजी त्यांनी लोकांना विसरायला लावली आणि रांगणेकर-गुलमहंमद यांच्यापेक्षाही आपण काही ताज्या दमाचे आणि तडफेचे क्षेत्ररक्षक आहोत हे त्यांनी पटवून दिले.

न्यूझिलंडविरुद्धचा पहिलाच विजय समाधानकारक असला तरी भारतीय क्रिकेट संघाने यापुढेही अधिक एकजुटीने आणि निश्चित ध्येयप्रवृत्तीने पुढील सामने लढविले पाहिजेत. वेळेचे भान ठेवून जर आमचे खेळ निसर्गदत्त खेळाडू आपल्या गुणांचा जास्तीत जास्त फायदा संघाला करून देतील तर भारतीय क्रिकेटकडे अधिक आस्थेने आणि अपेक्षेने आम्ही पाहू शकू. या विजयाने भारतीय क्रिकेटला एक नवी दिशा दाखविली, हेच खरे.

**मनोहर रेगे**

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**